# प्रकरण तिसरे

# 'बारोमास' मधील ग्रामीण शेतकरी जीवनचित्रण

# प्रकरण तिसरे

# 'बारोमास' मधील ग्रामीण शेतकरी जीवनचित्रण

### ❖ प्रास्ताविक: -

शेती आणि शेतकरी यांचा एकमेकांशी घनिष्ठ संबंध असतो. शेतकऱ्यांचे सारे जीवन शेतीवर अवलंबून असते. शेतकरी हा सर्वांचा अन्नदाता असूनही या भूमिपुत्राला आत्महत्या करण्याची का वेळ येते ? तो सतत दारिद्र्यात जीवन का जगतोय ? शेतमालाला चांगला दर का मिळत नाही ? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. सावकार शेतकऱ्यांचे शोषण करतात. भांडवलशाहीच्या युगात शेतकरी कंगाल असतो. अनेकदा शेतकरी संघटनेने मोर्चा काढून, रास्ता रोको आंदोलन करूनही त्याचा काहीच परिणाम होत नाही. याउलट शेतकऱ्यांनाच अटक होते. या कादंबरीद्वारे लेखकाने कृषिव्यवस्थेतील कळीच्या प्रश्नाला हात घालून शेतकऱ्यांच्या समस्या मांडण्याचा एक यशस्वी प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये 'बारोमास' मधील ग्रामीण शेतकरी जीवनाचा सांगोपांग अभ्यास करावयाचा आहे. शेतकऱ्यांच्या व्यथा - वेदनांचा पट लेखकाने मांडून दरिद्री शेतकऱ्यांचे दर्शन घडविले आहे. दारिद्र्यामुळे शेतकरी मानसिक कुंचबनेचा बळी ठरला आहे. 'बारोमास' मधील ग्रामीण शेतकरी जीवनाचा विचार दारिद्र्यामुळे नाडलेला शेतकरी, भांडवलशाही आणि पारंपरिक कृषिव्यवस्था, शेतकऱ्यांचे सावकाराकडून होणारे आर्थिक व मानसिक शोषण या मुद्यांच्या आधारे करावयाचा आहे.

### ❖ गरीब दरिद्री असा नाडलेला शेतकरी: -

**प्रास्ताविक: -**

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी वर्ग हा दिवसेंदिवस अतिदरिद्रीच होत चालला आहे. शेती हा शेतकऱ्यांचा आत्मा आहे. पण याच शेतीपायी शेतकरी दारिद्र्याच्या खाईत लोटला जातोय याचे भान ठेवायला हवे. शेतकऱ्यांच्या या परिस्थितीला जबाबदार कोण ? सर्वांचा अन्नदाता असूनही तो उपेक्षित जीवन का जगतोय ? असे अनेक प्रश्न विचार करायला भाग पाडतात.

'बारोमास' या शीर्षकावरून कादंबरीची व्याप्ती लक्षात येते. शेतकरी

जीवनावर या अगोदर कादंबऱ्या निर्माण झाल्या नाहीत असे नाही. र. वा. दिघ्यांची 'पाणकळा', 'सराई', 'पड रे पाण्या', आनंद यादवांची 'गोतावळा', रा. रं. बोराडयांची 'चारापाणी' या काही कादंबऱ्यांनी शेती जीवनाशी आपली नाळ घट्टपणे बांधली आहे. शेतकऱ्यांच्या व्यथा मांडण्यासाठी उचललेले हे पहिले पाऊल होते असे म्हणणे योग्य ठरेल. 'बारोमास' ही कादंबरी आणखी एक पाऊल पुढे उचलून एका नव्या जाणिवेसह अवतरली आहे यात शंकाच नाही.

'सांजोळ' नामक प्रातिनिधिक खेडे साकार करून बारा महिने शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या वास्तव जीवनाचे दाहक चित्रण 'बारोमास' मध्ये अत्यंत सामर्थ्याने लेखकाने चित्रित केले आहे. 'ही कथा सांजोळ या गावाची नसून देशातील कोणत्याही गावात ती घडू शकते' असे महाराष्ट्र टाईम्सने म्हटले आहे. 'बारा महिने अठरा काळ' शेतात राबणारा शेतकरी कधीच सुखी दिसत नाही. अठराविश्वे दारिद्रयच त्याच्या नशिबी येत असते याची कारणे शोधण्याचा एक प्रयत्न लेखकाने केलेला दिसून येतो. दरिद्री शेतकरी कुटुंबाच्या व्यथेने सुरू झालेल्या कर्मकहाणीचा शेवटही दारिद्रयातच होतो. शेतकरी हा राब - राबत असतो. तो कोणत्याही सुखाची अपेक्षा करीत नसतो तरीही त्याच्या वाटयाला सुखाचा एक घासदेखील येत नाही. त्याच्या जीवनाची होणारी ससेहोलपट आपल्या मनाला अस्वस्थ करून जाते.

जगातील एक कृषिप्रधान देश म्हणून आपला भारत देश ओळखला जातो ही बाब जरी खरी असली तरी शेतकऱ्यांकडे व शेतीकडे पाहिजे तेवढे लक्ष दिले गेले नाही हेही तितकेच सत्य आहे.

शेतकऱ्यांच्या या अवनत स्थितीला जबाबदार असणाऱ्या घटकांचा शोध लेखकाने घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला दिसून येतो. केवळ शोधच नव्हे तर त्यावर उपायही शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. नैसर्गिक आपत्ती, सरकारचे आयात - निर्यात धोरण, भांडवलशाही, शिक्षणाचे झालेले बाजारीकरण, जागतिकीकरण या चक्रव्युहात सापडलेला शेतकरी दारिद्रयात खितपत पडलेला दिसून येतो. आधुनिकीकरण होत असता, बदलत्या काळाला सामोरे जाताना शेतकऱ्यांची कोंडी होताना दिसते. जागतिकीकरणाच्या या महालाटेला सामोरे जाण्याइतका आपला शेतकरीराजा अजूनतरी तितका सक्षम झालेला नाही ही बाब मान्य करायला हवी.

विदर्भातील 'सांजोळ' या गावातील एका सव्वीस एकर शेती असणाऱ्या शेतकऱ्याच्या विदारक परिस्थितीचे दयनीय वास्तव चित्रण करणारी कलाकृती म्हणून 'बारोमास' वाचकाचे लक्ष वेधून घेते. या शेतकरी कुटुंबाची झालेली वाताहत मानवी मनाच्या ठिकऱ्या - ठिकऱ्या करून जाते. 'कष्टाळू शेतकऱ्यांच्या जीवनाची झालेली

शोकांतिका' असेच या कादंबरीला म्हणणे अधिक योग्य ठरेल. 'बारोमास' चा अभ्यास करताना असे लक्षात येते की, ही शोकांतिका एका कुटुंबाची किंवा विदर्भातील एका शेतकऱ्यांची नसून ती आपल्या देशातील समग्र शेतकऱ्यांची प्रतिनिधी आहे.

'बारोमास' या कलाकृतीच्या प्रारंभीच शेतकऱ्यांच्या दारिद्रयाची कल्पना येऊ लागते. शेतकरी हा असा एकच वर्ग आहे की, त्याला अनेक चिंता भेडसावत असतात. पाऊस पडायच्या अगोदर पेरणीसाठी लागणाऱ्या पैशाची चिंता लागलेली असते हे सुभानरावांच्या बोलण्यातून सूचित होते.

"....पण आता मिरूग तोंडावर आला लागवडीची चिंता पल्डी इट्टलाले"[१]

'असं बाप म्हणाला. अन त्याच्या पोटात एकदम खोल खड्डा झाला. तोंडातला घास तोंडातच गुरमळत राहिला'[२] शेतकऱ्यांची ही चिंता काही एका दिवसाची नसते तर येणाऱ्या प्रत्येक हंगामावेळची असते. हंगामामागून हंगाम तोटयात गेल्याने शेतकरी बिनभांडवलाचा धनी झालेला असतो. अगोदरच्या हंगामासाठी काढलेले बँकेचे कर्जही थकलेले असते. याशिवाय सावकारी कर्जावर व्याज अधिक असल्याने त्याच्याकडून कर्ज काढणे शक्य नसते. त्यामुळे एकनाथची चोहोबाजूने कोंडी होते. बऱ्याचदा शेतकरी आपल्या घरातील स्त्रियांचे दागिने मोडून शेतात भांडवल घालत असतो. पण प्रत्येक वेळी दागिने मोडणे शक्य नसते. येणाऱ्या हंगामावर मोडलेले दागिने परत नवीन करायचे अशी वेडी आशा त्याने मनात बाळगलेली असते पण शेतकरी मात्र एकदा मोडलेला दागिना परत करू शकत नाही. कारण शेतीत जेवढे भांडवल तो खर्च करतो तेवढे उत्पन्नही निघत नाही. अशा वाईट परिस्थितीत शेतकरी जीवन जगत असतो.

शेतकऱ्याच्या घराकडे पाहताच शेतकऱ्याच्या दारिद्रयाची कल्पना स्पष्टपणे येते. चार मातीच्या भिंती असणारे घर वर गळके टीनपत्रे. या गळक्या घराला मोडके असणारे दार पाहूनच मनात उदासी दाटून आल्याशिवाय राहत नाही. या शेतकऱ्याच्या घरात सतत पैशाची टंचाई असल्याने जीवनोपयोगी वस्तुंचाही तुटवडा असतो. घरात कधीच पुरेसे किराणासामान नसते. छटाक - पावशेर अशा वस्तू आणून अत्यंत हालाखीचे जीवन जगतो. लेखकाने अलकाच्या बोलण्यातून दारिद्रयाची जाणीव स्पष्ट करून दिली आहे. ती म्हणते, "खूप दरिद्री आणि भिकारचोट घर आहे. हे शेतकऱ्याचं घर आहे. कधीही हाय हायच इथं पाहुणे आले की पावभर साखर अन् चहाची पुडी आणायला दुकानवर पळावं लागते. मजुरापेक्षाही वाईट परिस्थिती आज पाहुणचार करायचा म्हटलं तर पावभर तेल, किलोभर रवा अन् किलोभर साखर वेळेवर विकत आणली होती. जेवण झाल्यावर द्यायला घरात सोपसुपारी नाही, म्हणून आता

दुकानवर गेला माझा दीर. . . .”[३] अलकाच्या या बोलण्यातून शेतकऱ्यांच्या घरातील परिस्थितीची कल्पना येते.

शेतकरी म्हणून जीवन जगताना शेती म्हणजे एक रात्रंदिवस चालणारी लढाई असते. ही लढाई संकटांची असते. पाऊस पडताच पेरणीचे संकट उभे राहते. पेरणी करण्यासाठी पैशाची औत - फाटयाची जुळवाजुळव करावी लागते. कर्ज काढून बी - बियाणे मातीत घातले म्हणजे संकट संपले असे होत नाही तर त्याचा सतत जीवनसंघर्ष चाललेला असतो. पीक पेरणीपासून पीकाचे उत्पन्न निघेपर्यंत शेतकरी रात्रंदिवस एखाद्या गुरासारखा राबत असतो. शेतकरी हा शेतात शारीरिक कष्ट तर करीत असतोच पण त्याचे मानसिक कष्टही महत्त्वाचे असते. शेतकरी हा देहाने आणि मनानेसुध्दा काळया मातीशी एकरूप झालेला असतो. शेती हेच आपले जीवन आहे असे मनाशी ठरवूनच तो जगत असतो. शेती कितीही तोटयात गेली तरी त्याचा जीव या शेतीतच रमलेला असतो. हे वास्तव लेखकाने सुभानरावाच्या व्यक्तिरेखेतून साकारलेले आहे.

शेतीव्यवसाय करीत असताना शेतकऱ्यांना अनंत समस्यांना सामोरे जावे लागते. एका समस्येतून मार्ग काढताच दुसरी समस्या ‘आ’ वासून समोर उभी ठाकते. शेती ही प्रामुख्याने निसर्गावर अवलंबून असते. पण हा निसर्गच केव्हा दगा देईल हे सांगता येत नाही. निसर्गच शेतकऱ्यांचा शत्रू बनला आहे. शेतीसाठी पाऊस कधी वरदान ठरतो तर कधी शाप ठरतो. निसर्ग कधीच शेतकऱ्यांला योग्य साथ देत नाही. शेतीसाठी जेव्हा पावसाची आवश्यकता असते तेव्हा तो पडत नाही आणि नको तेव्हा पडून हातातोंडाशी आलेल्या पिकाची नासाडी करून शेतकऱ्यांची झोळी नुकसानीने भरून टाकतो. निसर्गापुढे शेतकऱ्यांचे काहीच चालत नाही हे तितकेच सत्य आहे.

शेतकऱ्यांचा दुसरा महत्त्वाचा शत्रू म्हणजे आपल्या मायबाप सरकारने राबविलेले आयात निर्यातीचे धोरण. आपल्या देशात पिकणाऱ्या शेतमालाचीच आयात सरकार करीत असते आणि निर्यातीवर बंधन घातल्याने आपल्या देशातील शेतकऱ्यांच्या मालाला योग्य तो भाव मिळत नाही. नाईलाजाने मिळेल त्या भावाने शेतमाल विकावा लागतो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हाती काहीच येत नाही. तो आणखी कंगाल होतो. पण आजच्या काळात पैशाला नको तितके महत्त्व प्राप्त झाले आहे. ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. पैशावाचून जगातील कोणतीच कामे होत नाहीत म्हणूनच माणसापेक्षा पैसा अधिक महत्त्वाचा झाला आहे हे तितकेच सत्य आहे.

आपल्या देशातील गरीब शेतकरी हा प्रत्येक ठिकाणी नाडलेला दिसून येतो. त्यांची नाडणूक खाजगी संस्थावाले करीत असतातच पण सरकारी कर्मचारीसुध्दा

करतात. ही समस्याही लेखकाच्या नजरेतून सुटली नाही. कोणत्याही बँकांचे कर्ज काढण्यासाठी कागदपत्रे बँकेत जमा करावी लागतात. पण हीच कागदपत्रे गोळा करता - करता शेतकरी कंटाळून जातो. एक सातबारा काढण्यासाठी तलाठयाच्या कार्यालयात शेतकऱ्यांना शंभर चकरा माराव्या लागतात. सातबारा हा सरकारी असून खरेतर तो शेतकऱ्यांना विनाशुल्क द्यायला पाहिजे. पण हे सरकारी अधिकारी त्याचा फॉर्मसुध्दा मोफत देत नाहीत. सरकारने मोफत सातबारा देण्याची योजना आखली असली तरी हे कर्मचारी पळवाटा काढून ही योजना प्रत्यक्ष अंमलात न आणता भ्रष्टाचार करताना दिसून येतात. पाच - पन्नास रूपयांची लाच तलाठयाच्या हातावर ठेवताच मग मात्र तो खुशीने फॉर्म देतो. मोफत असणाऱ्या या योजनेला हे सरकारी कर्मचारीच बट्टा लावताना दिसतात. शेतकरी हा पैशाअभावी जेरीस आलेला तर असतोच पण हे अधिकारीही शेतकऱ्यांची अडवणूक करण्याची एकही संधी सोडत नाहीत. बळीमामासारख्या गरीब शेतकऱ्याची अडवणूक कांबळेसारखा शासकीय कर्मचारी करताना दिसतो. या तलाठयाविरूध्द शेतकरी कुणाजवळ तक्रारसुध्दा करू शकत नाही. कारण दर हंगामात त्यांना तलाठयाचे पाय धरावे लागतात. तलाठी मात्र आपल्या अधिकाराचा गैरवापर करून जेवढे शेतकऱ्यांला वाकवता येईल तेवढे हे अधिकारी त्यांना वाकवतात. केव्हा तरी एखाद्या दिवशी तलाठयाची भेट होत असते. हे तलाठी शेतकऱ्यांची अडवणूक करून त्यांच्या तोंडचे पाणी पळवतात हे खालील उद्‌गारातून दिसून येते. 'बळीमामा रडकुंडीला येऊन कांबळे तलाठयाशी बोलत होता आज कितीतरी दिवसांनी त्याला तलाठी भेटला होता'[४] येथे सरकारी कार्यालयात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा बेशिस्तपणा लेखकाने नजरेस आणून दिला आहे.

माणुसकीपेक्षा पैशाला अधिक किंमत आली आहे. पैशाशिवाय सरकारी पगार घेणारे कर्मचारीसुध्दा आपला खिसा भरल्याशिवाय शेतकऱ्यांचे कोणतेच काम करीत नाहीत. हे पुढील संवादावरून स्पष्ट होते.

"आली गडया इंगळे पुन्हा ही टोपी. आता या टोपीले पाह्य किती हेलपाटे मारा लावतो मी." 'असं म्हणून घाईने पुढे जायला लागला.'

'तस तुळशीरामने त्याला अडवलं.'

"आहो कांबळे साहेब, थांबा थांबा ?"

"बोला काय काम आहे तुमचं ?" कांबळेने विचारलं.

"माहं नाई. या बळीराममामाचं हाये!"

"आसं का ? थांबा मंग आमी येतो चहापानी घेऊन. बसा म्हणा आरामात."

"आहो तसं नाई कांबळे साहेब. इकडं पहा. हे चहापाणी आणलं तुमचं. द्या त्याहले मोकळं करून."

"असं म्हणून तुळशीरामने पन्नास रूपये त्याच्या हाती दिले. तसा कांबळे खूष झाला. गुळचट हसला"[५] या ठिकाणी सरकारी कर्मचाऱ्यांच्या भ्रष्टाचारावर अत्यंत प्रखरपणे विचार मांडला आहे हे दिसून येते.

शेतकरी हा असा एकच घटक आहे की तो पैशाची बचत करू शकत नाही. कधी कोरडा दुष्काळ तर कधी ओला दुष्काळ पडल्याने शेतीचा धंदा दिवसेंदिवस तोटयातच चाललेला आहे. शेती म्हणजे बेभरवशी धंदा असेच समीकरण होऊन बसले आहे. शेतकऱ्यांचे सारे जीवन निसर्गाच्या कृपेवर चाललेले असते. निसर्गाची अवकृपा झाली तर शेतकरी बरबाद झाल्याशिवाय राहत नाही हे तितकेच खरे आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याचा एक अयशस्वी प्रयत्न हा शेतकरी करीत असतो. शेतकऱ्यांची तिजोरी कधीच भरत नाही. ती सदान्‌कदा रिकामीच असते हे सत्य सुभानरावांच्या बोलण्यातून स्पष्ट होते. ते म्हणतात, "....अन्‌ बचत खातं म्हणशील त शेतकऱ्यांले कुठी बचत खातं आस्ते ? गचत खाते आस्ते बुवा लयच लय...."[६] सुभानरावांचे हे पैशाचे गाऱ्हाण काही एकटयाचे नव्हे तर साऱ्या शेतकरी वर्गाचे आहे. शेती नफ्यापेक्षा तोटयात अधिक चालल्यामुळे शेतकऱ्यांचे सारे जीवन दारिद्रयात होरपळून निघते. जीवन जगण्यासाठी लागणारा पैसा त्याच्याकडे कधीच शिल्लक राहत नसतो. आजचे युग हे माणसापेक्षा पैशाला अधिक महत्त्व देणारे असेच आहे. ज्याच्याकडे भरपूर पैसा आहे त्यालाच आज किंमत आहे. शेतकऱ्यांना मिळालेल्या गरिबीच्या शापाला उ:शाप कधी मिळणार असाही एक विचार मनात येतो. आयुष्यभर कष्ट करूनही एखादा सुखाचा क्षणही त्याच्या वाटयाला येत नाही. इतका तो दुर्दैवी असू शकतो हे पाहून मन गलबलून येते.

आपल्या हिंदू धर्मात अनेक सणवार, रीतीभाती अत्यंत उत्साहाने पार पाडले जातात. पण शेतकरी कोणताही सणवार, रीतभात पैशाअभावी नीटपणे पार पाडू शकत नाही. एखाद्या शेतकऱ्यांची मुलगी माहेरपणाला आली तर रीतरिवाज म्हणून तिच्यासाठी एखादी साडी किंवा बांगडीसुध्दा घेण्याइतकी त्याची ऐपत नसते. हे फार मोठे दुर्दैवच म्हणावे लागेल.

शेतकऱ्यांची सतत फरफट होताना दिसते. पाऊस पडला तरी शेतकरी

तणावग्रस्त असतो आणि पाऊस नाही पडला तरी तो तणावग्रस्त असतो. पावसाची वाट पाहणारा शेतकरी अधिक दु:खी दिसतो. कोरडा दुष्काळ पडताच हे भोळे शेतकरी भटजीचा आधार घेतात. पावसाचा योग पाहून गावातल्या सर्व देव - देवतांना नवस करतात. सतत आपले मन कशात तरी गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. पण हे सारे करूनही दुर्दैवाने पाऊस आलाच नाही तर शेतकरी पूर्णपणे हवालदिल होतो. त्याच्या घशाला कधीच न शमणारी कोरडच पडली आहे असे वाटते.

बी मातीत घातले म्हणजे शेतकरी मुक्त होत नाही. पावसाआभावी आलेले पीक जळून गेले तर दुबार पेरणीच्या धास्तीने तो खचून जातो. दुबार पेरणीसाठी त्याची खर्च करण्याची ताकदच संपून गेलेली असते. नाईलाजास्तव हा शेतकरीराजा गावातील एखाद्या श्रीमंत सावकाराकडून व्याजाने कर्ज काढून पेरणी करतो. पावसाआभावी शेतकरी अनेक अग्निदिव्यातून जात असतो असे म्हटले तरी वावगे ठरू नये.

शेतकऱ्यांची शेती ज्या बैलांच्या जीवावर चाललेली असते त्या बैलांना शेतकरी आपले पूज्य दैवत मानतो. पण याच दैवतांना ज्यावेळी घालण्यास चारा नसतो तेव्हा त्याच्या जीवाची तगमग होत असते. पैशाअभावी वीजबिले भरू न शकणारा शेतकरी गुरांसाठी चारासुध्दा देऊ शकत नाही ही समस्या लेखकाने सविस्तरपणे मांडलेली दिसून येते.

खंडू आणि एकनाथ यांच्यात झालेल्या संवादातून वास्तव परिस्थितीची जाणीव आपणास होते.

"कारे, आरामात बसला. चारापाणी केलं का ?"

"पाणी पाजलं ढोरायले. चाऱ्याचा काई मेळ नाई एकुभाऊ. कडबा आणावं लागते. कुटी करेल व्हती. ती सरून गेली. कुटाराच्या खोलीत आताच लयच लय चार दिवस पुरंल एवढी वैरण हाये. आपून कडाळ टाकायले पाह्यजे व्हती एकुभाऊ. . . ."

"पण पाणी कुठून देलं आस्त. . . .आपल्या बोकांडी नऊ हजार सातशे चाळीस रूपये लाईन बिल थकित हाये. ते भरल्याबगर आता कनेक्शन जोडल्या जात नाई."

"तेबी खरचं हाये"[७]

शेतकरी हा काही एकाच बिकट समस्येने ग्रासलेला नसतो तर समस्यामागून समस्या येत असतात. या समस्या सोडविण्यासाठी शेतकऱ्यांची संघटना असणे

आवश्यक ठरते. शेतकऱ्यांची बाजू मांडण्यासाठी गावागावात शेतकरी संघटना निर्माण झाल्या असल्या तरी त्या संघटनांना फारसे यश प्राप्त झालेले दिसत येत नाही. एकतर शेतकरी संघटित होऊ शकत नाही आणि शेतकऱ्यांची एकजूट कमकुवत स्वरूपाची वाटते. शेतकरी संघटनेने हक्कासाठी मोर्चा काढला असता शेतकरी संघटनेच्या नेत्याला अटक होते. त्याच्यावर अन्याय केला जातो. याशिवाय त्याच्यावर खटले दाखल केले जातात. या खटल्यांच्या वारंवार पडणाऱ्या तारखांना हजर व्हावे लागते. या तारखांमध्ये जवळ असणारे सारे पैसे खर्च होऊन जातात. या तारखांमुळे शेतकरी पूर्णपणे कंगाल होऊन जातो. जेरीस आलेला शेतकरी या संघटनेतून काढता पाय घेतो. शेतकरी मेळाव्यात थोर व्यक्तींनी दिलेली व्याख्याने ऐकायला गोड वाटत असली तरी प्रत्यक्षात अंमलबजावणी मात्र शेतकरी करू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच शेतकरी संघटना शेतकऱ्यांसाठी भरीव काम करू शकत नाही.

शेतकऱ्यांचे खरे दुखणे काय आहे हे फक्त हाडामासाने प्रत्यक्ष शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांलाच माहीत असते. हे दुखणे मांडण्यासाठी शेतकऱ्यांचे व्यासपीठ असणे आवश्यक वाटते. शेतकऱ्यांना संघटित करून शेतकऱ्यांना आधार देण्याची गरज आज निर्माण झाली आहे. कारण आज खेडयातील शेतकऱ्यांची अवस्था पूर्वी च्या दलितापेक्षाही भयानक झालेली दिसून येते. गुलामासारखे जीवन जगणारा शेतकरी मुक्त झाला तरच देशाची प्रगती होईल.

शेतकऱ्यांला अगदी राजरोसपणे लुबाडले जाते अशी एक व्यवस्थाच आपल्या देशामध्ये पूर्वीपासून करून ठेवली आहे. शेतकरी हा वरच्या स्तरापासून ते खालच्या स्तरापर्यंत अगदी साखळी पध्दतीने पध्दतशीररीत्या लुबाडला जात आहे. सरकारने शेतकऱ्यांसाठी योजलेल्या उपाययोजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचतच नाहीत. या योजना मधल्या - मध्येच हे सरकारी कर्मचारी गिळंकृत करतात. या योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रत्येक कर्मचाऱ्याचा वाटा द्यावा लागतो. या वाटयातून जो काही भाग शिल्लक राहतो तो शेतकऱ्यांपर्यंत कसातरी येऊन पोहचतो. या शेतकऱ्यांला तेवढयावरच समाधान मानावे लागते. या भ्रष्टाचाराच्या प्रकारामुळे बऱ्याचदा शेतकरी आपल्याला मिळालेला धनादेश न वटवता फेकून देतो. शेतकऱ्यांवर ही वेळ समाजव्यवस्थेनेच आणली आहे असे वाटते. रात्रंदिवस कष्ट करून - करून शेतकऱ्यांच्या हाडाची काडं झालेली असतात. "खेडयातला कोणताबी माणूस म्हन्जे ज्यो शेतकरी हाये अंगमेहनत करते, त्यो पन्नास किलोच्यावर भरत नाई. बाई चाळीस किलोच्यावर भरत नाई. आरे याह्यचं मास गेलं कुठी ? कोण खाल्लं याह्यचं मास ? कावून कडकड वाळा लागले हे वाळल्या लाकडावाणी ? तेच गाद्या - गिरद्यांवर

बसून व्यापार करणारे पाहा शंभर किलोच्या खाली एक भरत नाई."[८] यावरून खेडयात राहणारा गरीब दरिद्री शेतकरी आणि शहरात राहून ऐशोरामात जीवन जगणारा व्यापारी यांच्यातील भेद लक्षात येतो.

'दुरून डोंगर साजरे' अशी गत आपल्या देशातील शेतकऱ्यांची झालेली दिसून येते. दुरून पाहणाऱ्याला शेतकरी सुखी वाटतो. कारण शेतकरी एका दाण्याचे हजार दाणे करतो पण शेतकऱ्यांपेक्षा आजचा मजुर अधिक सुखी जीवन जगताना दिसतो. हे मुगुटराव या व्यक्तिरेखेद्वारे लेखकाने दाखवून दिले आहे. आठवडयातून दोन दिवस मजुरी करून उरलेले दिवस आरामात घालवतो. शेतकरी मात्र एक दिवसही आराम करू शकत नाही. सारासार विचार करता या शेतकऱ्यांला मजुराइतकीही मजुरी मिळत नसते. तेजराव खपके आणि एकनाथ यांच्या संवादातून सत्य परिस्थितीची जाणीव होते.

"कशाचा फतराचा सुखी. आता एकनाथ, मले तू सांग, तुह्या कामावरच्या खंडयाले किती रोज देतू ?"

"पन्नास रूपये"

"मंग तू मालक हाये. त्यो नोकर. त तुले निदान शंभर रूपये त रोज पडायले पाह्यजे. म्हन्जे सालाचे तुहे बार त्रिक् छत्तीस हजार रूपये बचत पाह्यजे. राह्यतात बचत ?"

"अजिबात नाय."[९]

एवढेच नव्हे तर या मजुरांना चांगलाच भाव आलेला असतो. मनुष्यबळाशिवाय शेतकरी शेती करू शकत नाही याची खात्री या मजुरांना झाल्याने हे मजुर लोकसुध्दा शेतकऱ्यांची नाडणूक करताना दिसतात. म्हणूनच मुगुटराव सारख्या मजुराचा तिरस्कार वाटत असूनही त्याला निमूटपणे सहन करून घ्यावे लागते. एकनाथच्या घरी येऊन टिव्ही पाहायला येणारा मुगुटराव कामाला न येण्याची धमकी एकनाथला जेव्हा देतो तेव्हा येथे त्याची अरेरावी पहावयास मिळते. दिवसभर मजुरी करून संध्याकाळी मजुरी घेण्यास आलेला मजुर कधीच समजूतदारपणे वागताना दिसत नाही.

सालगडी म्हणून काम करणारा मजुरही मागचा - पुढचा विचार न करता पैशासाठी आडून बसतो. थोडक्यात काय शेतकरी हा चोहोबाजूंनी कोंडीत सापडलेला आहे ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे.

शेतकरी सतत एखाद्या दीन - दुबळया लाचार भिकाऱ्याप्रमाणे जीवन जगत

असतो. शेतीत पेरण्यासाठी लागणाऱ्या बियांणापासून ते उत्पन्न निघेपर्यंत त्याला दुकानदारापुढे हात करून भीक मागवी लागते. पैसे नसतील तर हे दुकानदार शेतकऱ्यांना दारातही उभे करीत नाहीत. दुकानदारांच्या हातापाया पडून बी - बियाणांचा मेळ लावून पेरणी केली असली तरी पीक निघेपर्यंत शेतकऱ्यांना धास्ती लागलेली असते. कारण पीकाचे उत्पन्न चांगले निघेल याची शाश्वतीच नसते. उत्पन्नापेक्षा खर्चाचेच प्रमाण अधिक असते. एका मागून एक संकटांचे खड्डे तयार होत असतात. एक खड्डा भरून काढावा तर दुसरा तयार होत असतो आणि दुसरा खड्डा भरावा तर तिसरा खड्डा तयार होत असतो. ही संकटाची मालिका शेतकऱ्यांची पाठ सोडायला तयार नसते. हंगाम तोटयात गेला तर काढलेले कर्ज आणि त्या कर्जा वरचे व्याज वाढत जाते तो कर्जबाजारी होऊन आणखी दरिद्री होत जातो. ही वस्तुस्थिती आहे.

शेतकरी हा भौतिक सुखवस्तुंचाही कधी लाभ घेऊ शकत नाही. त्याच्या घरात कोणत्याच भौतिक सुख देणाऱ्या वस्तू दिसत नाहीत. घरातील माणसांना पुरेसा कपडालत्तासुध्दा घेऊ शकत नाही. शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलाला उच्च शिक्षण घेण्यासाठी पैसे नसल्याने ही मुले अर्धवट शिक्षण घेऊन वाममार्गाला लागलेली दिसून येतात. त्यातून एखाद्या शेतकऱ्यांने मुलाला पदवीपर्यंत शिक्षण दिले असले तरी नोकरीसाठी पैसे देण्यास त्यांच्याकडे नसतात. ही वास्तव परिस्थिती नाकारता येत नाही.

शेतीव्यवसायाची चाललेली ही घसरण शेतकरी वर्गाचे अस्तित्व संपवून तर टाकणार नाही ना ? अशी भितीही निर्माण झाली आहे. आज तोटयात जाणाऱ्या शेतीव्यवसायाकडे आजची तरूण पिढी दुर्लक्षित होऊ लागली आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जे काही उत्पन्न निघेल ते व्यापाऱ्यांच्या स्वार्थी धोरणामुळे मातीमोलाने विकावे लागते. फायदा होण्यापेक्षा तोटा अधिक सहन करावा लागतो. शेतकरी हा केवळ चांगले दिवस कधीतरी येतील या आशेवरच जगत असतो. शेतकऱ्यांच्या घरात जन्म म्हणजे मागच्या जन्मात पाप केले आहे अशी दु:खी भावना शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांच्या मनातील व्यथा - वेदना खालील संवादातून स्पष्ट होतात.

"कधी यायचे शेतकऱ्याचे चांगले दिवस ?"

"आता चांगले दिवस मेल्यावरच. शेतकऱ्याच्या पोटी जल्माले येणं म्हणजे मांगल्या जन्मातलं पाप फेडणं झालं आता. जो शेतकऱ्याचे पोटी जल्माले आला, समजावं की यानं मांगल्या जल्मात लय पाप केलं!"

"पाप - पुण्याचं काय खरं असते तात्या ?"

"पण तेच खरं म्हणायची पाळी आली न आता. तूच सांग. शेतकऱ्याच्या पोराले जवानी येती का ? तुले जवानी आली का ?"

"म्हणजे ?"

"म्हन्जे आसं की शेतकऱ्याच्या पोराचं डायरेक प्रमोशन व्हते. बालपणातून म्हातारपणात. कावून की कुणबिक हाती आली की त्याच्यामागं चिंताच एवढया लागतात की त्यो जवानीत म्हतारा होऊन जाते. रोजचा दिवस चिंतेचा. आज काय त पाऊस पडंल का ? उद्या काय त बियाची सोय लागंल का ? किराणा कपडे, लगनकार्य , मरणं - धरणं .... अन् सम्दं दुखणं थांबते कुठी ? पैशाजवळ ....शेतकऱ्याजवळ पैसाच येत नाई. म्हणूनच म्हन्तो आता शेतीचं अर्थशास्त्र लय इतळलं. अन् फाटल्यावर शिवता येते. इतळल्यावर कुठी शिवता येते ?"

"कसं व्हायचं मग शेतकऱ्याचं ?"[१०]

या संवादातून शेतकऱ्यांच्या मनातील भावनांचा उद्रेक पहायला मिळतो. या भावना कुणा एका शेतकऱ्यांच्या नसून एकूणच शेतकरी वर्गाच्या आहेत हे विसरून चालणार नाही.

'बारोमास' या कलाकृतीच्या पाना - पानातून शेतकऱ्यांच्या दरिद्री जीवनाची लक्तरेच झालेली दिसून येतात. शेतकरी डबघाईला कसा येत चालला आहे याचा सारा पाढाच लेखकाने म्हटला आहे. शेतकऱ्यांचे जीवन एखाद्या दिशाहीन झालेल्या पाखरासारखे झाले आहे. सरकारने शेतकऱ्यांसाठी राबविलेल्या योजना नवजीवन देणाऱ्या वाटत असल्या तरी त्यात फारसे तथ्य आहे असे वाटत नाही. सरकारने दिलेली आर्थिक मदत ही शेतकऱ्यांना दिलेली भीक वाटते. ही भीकसुध्दा त्यांना डोईजड होत असते. एकरी दोनशे रूपये अशी अल्पमदत सरकार करते. पण हे दोनशे रूपये घेण्यासाठी शेतकऱ्यांला अगोदर दीडशे रूपयांची पदरमोड करावी लागते. तहशील कार्यालयात हेलपाटे मारून - मारून शेतकरी जेरीस येत असतो. त्यापेक्षा ही मदत नसलेलीच बरी असे म्हणून धनादेश न वटविताच एखाद्या कोपऱ्यात फेकून देऊन मोकळा होतो. सरकारी अधिकाऱ्यांचे खिसे भरल्याशिवाय सरकारने दिलेली ही मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहचतच नाही. हे कटू असले तरी ते सत्यच आहे. हे लक्षात घ्यायला हवे. येथे सरकारी अधिकाऱ्याच्या अनागोंदी कारभाराचे दर्शन लेखकाने कानपिचकी घेतल्यासारखे घडविले आहे. या कारभारामुळे शेतकऱ्यांना सावकाराकडून ताबडतोब उपलब्ध होणारे कर्जच अधिकतर सोयिस्कर वाटत असते. सावकाराकडून ते जास्त

व्याजदराने काढावे लागते. हे कर्ज शेतीत झालेल्या तोटयामुळे तो फेडू शकत नाही. या कर्जाचे व्याज चक्रवाढीने वाढत जाते आणि कर्ज थकल्यामुळे कर्जाचा महाडोंगर शेतकऱ्यांच्या डोक्यावर होतो. शेती विकूनही हे कर्ज न फिटणारे असते. या झालेल्या कर्जाच्या बोजाखाली हा दरिद्री शेतकरी पूर्णपणे दबला जातो. कर्जाचे व्याज हे शेतकऱ्यांना लागलेले न सुटणारे ग्रहण आहे असेच म्हणावे लागेल. कर्जाखाली दबलेला शेतकरी पुन्हा कधीच वर येऊ शकत नाही. व्याजावर व्याज वाढत जाते कारण व्याज कुणासाठी थांबत नसते. हे शेतकरी जीवनाचे सत्य आहे. "दुनियेत एकच गोष्ट आशी हाये की जिले आराम माईत नाई. अन् ती हाये व्याज. रात आसो. दिवस आसो. थंडी आसो का वारं उधाण आसो, सम्धा गोष्टी थकतील. चालायच्या थांबतील. पण व्याज थकत नाई. अन् थांबतबी नाई."[११]

निसर्गाच्या अवकृपेने शेतकरी हवालदिल होत असतोच पण सावकार, दुकानदारसुध्दा कर्जासाठी हैराण करतात. हंगामाच्या बोलीवर सर्व वस्तु उधार आणलेल्या असतात. व्यापारी लोक घरोघरी फिरून कर्जाचा तगादा लावतात. हे शेतकरी आपले तोंड लपविताना दिसून येतात. या साऱ्या भयानक वस्तुस्थितीचे चित्रण 'बारोमास' मधून सदानंद देशमुखांनी अत्यंत परिणामकारकतेने चित्रित केले आहे.

शेतकऱ्यांचा तिसरा आणि महत्वाचा शत्रू बाजारपेठा. निसर्गाच्या अवकृपेवर मात करून स्वत: जीवाचा आटापिटा करून एक - एक दाणा गोळा करून हे भोळे शेतकरी बाजारभाव वाढला अशी अफवा उठताच सारा माल बाजारपेठेत दाखल करतात. येथेही फसवणूकीचाच प्रकार पहावयास मिळतो. व्यापाऱ्याची वाट पाहणारा शेतकरी एखाद्या लाचार भिकाऱ्यासारखा वाटतो. या किळसवाण्या परिस्थितीचे चित्रण लेखकाने तपशीलवारपणे करून सत्य उघडकीस आणून दिले आहे. आपल्या देशातील शेतकऱ्यांचा माल निर्यात न करता त्यांच्याकडे असणाऱ्या मालाचीच आयात परदेशातून केली जाते आणि आपल्या देशातील मालाचे भाव एकदम कमी केले जातात. हताश होण्यापलीकडे त्यांच्या पदरी काहीच पडत नसते शिवाय याविरूध्द आवाज उठविण्याचे शेतकरी धाडसही करू शकत नाही ही फार मोठी खंत मनाला बोचून जाते. एखाद्या आठवडयात मालाचा भाव वाढला की शेतकरी घरातील सर्व माल विकतात. मग हे व्यापारी कमी दराने माल खरेदी करून साठवण करून ठेवतात आणि नतर महिन्या ते दोन महिन्यांनी हाच माल दुप्पट किमतीला विकतात. तेव्हा शेतकऱ्यांच्या घरात काहीच शिल्लक नसते. या परिस्थितीची जाणीव असूनसुध्दा त्याला गप्पच रहावे लागते.

"बरोबर हाये तात्याचं. पंधराशेच्या भावानं दोन - चार पोती इकली गेली. अन् त्यो भाव आयकून लोभी पडून, खेडयापाडयांतला खल्डून मालं मार्केटात आला. आता चालू हाये कटाई आठशे .... नऊशे .... लयच लय हजार. बसा बोंबलत. हाच माल हे बेपारी दोन मह्यण्यानं दोन हजार रूपये किंटलनं इकतील, जवा शेतकऱ्याच्या घरात मोंढयात आणायसाठी मूठभरबी दाणे नस्तील ...."[१२] हे सारे वास्तव नेमकेपणाने चित्रित केले आहे.

बाजारपेठेमध्ये व्यापाऱ्यांचीच हुकुमशाही असते. व्यापारी कधी बाजारपेठेत येतील हे सांगताच येत नसल्याने आठवडा - आठवडाभर शिळे तुकडे खाऊन, अशुध्द पाणी पिऊन धान्याच्या थैल्यावरच आराम करीत एखाद्या चातकाप्रमाणे शेतकरी या व्यापाऱ्यांची वाट पहात असतो. या संदर्भात लेखक लिहितो, "सांजोळच्या शेतकऱ्यांनी बुधवारच्या बोलीत आपला माल विकला जाईल या आशेने पोती आणली होती पण बुधवारी लिलाव झाला नाही. गुरूवारीही झाला नाही. शुक्रवारी एका सणाची सुटी आली. शनिवार - रविवार मार्केट बंद त्यामुळे सगळे कातावून गेले होते. एकजण गावी जायचा आणि सगळयांच्या भाकरी घेऊन यायचा. दुपारी कुठेतरी झाडाखाली भाकरी खायच्या, हौदातलं नळाचं पाणी प्यायचं आणि दिवसभर बिटी बिटी पहात आपसात चर्चा करत नुस्तं बसून रहायचं. तिथचं पोत्यांच्या थप्पीवर डोळे मिटून पडायचं. डुकरं, गायी, गाढवं यांना रात्रभर जागून हाकालत रहायचं. त्यामुळे शेतकरी सगळे त्यांनी वखरून टाकलेल्या वावरासारखे वखवख दिसत होते."[१३] येथे मानसिक व आर्थिक विवंचनेत सापडलेला शेतकरी पहावयास मिळतो. शेतकऱ्यांचे हे हाल पाहून मन उव्दिग्न होते.

आठवडाभर वाट बघणारा शेतकरी व्यापारी येताच आपल्या मालाला चांगला भाव मिळेल अशी आशा बाळगून असतो. पण सोन्यासारख्या मालाची हेटाळणी व्यापारी आणि आडते करतात तेव्हा शेतकऱ्यांच्या पायाखालची जमीन सरकते. शेतकऱ्यांच्या जीवावरच श्रीमंत होणारे व्यापारी शेतकऱ्यांना काडीइतकीही किंमत देत नसतो हेच येथे दिसून येते. "बेपारी गाद्या - गिरद्यावर लोळत पोत्यामागं हजारो रूपये नफा घेत्यात अन् आपून बारोमास राबून आपल्याले खण्ण्या ...."[१४] व्यापाऱ्याविषयी शेतकऱ्यांना वाटणारा तिरस्कार येथे प्रदर्शित झाला आहे. शेतकऱ्यांची अशी दयनीय स्थिती होण्यास कोण कोणते घटक आहेत हे समजते तरी त्यावर आपण काही उपाय करू शकत नाही हीच खंत मनाला टोचत राहते.

दरिद्री जीवनाचे चटके सोसणाऱ्या शेतकऱ्यांकडे बघताच त्याचे दारिद्रय किती भयानक आहे याची जाणीव खालील वर्णनावरून होते.

"कपडे मळलेले. पटक्यावर चाळणीतून उडालेली भुसकट, पांबा तुंबलेला. डोळयांत चिपडं, दाढी वाढलेली.. भयाण भेसूर. नेमकाच कमावत्या पोराला चितेवर जाळून स्मशानातून आलेल्या बापासारखा दिसत होता"[१५]

दारिद्रयात जीवन कंठत असणारा शेतकरी दिवसेंदिवस ढासळत जातो. या दारिद्रयाची घृणा वाटू लागते. आजचे जग हे पैशाच्या तालावर नाचणारे आहे आणि हाच पैसा त्याच्याकडे नसतो. शहरी जीवनाकडे आकर्षित होऊ पाहणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांची अवस्था केविलवाणी होऊन जाते. बँकांचे कर्ज, सावकाराचे कर्ज, निसर्गाची अवकृपा या साऱ्या समस्यांनी भयभीत झालेला शेतकरी तर मनाने खचला जातोच पण हळूहळू शरीरानेही खचत जातो. एकामागून एक आलेले दुर्दैवाचे भोग तो भोगत असतो. या दारिद्रयामुळे त्याच्या आयुष्यात एक भयाण अवकळा आलेली असते. मनात सतत भिती निर्माण करणारे विचार तर येतच असतात पण येणारा पुढचा भविष्यकाळही अंधारमय दिसतो. या साऱ्या गोष्टींनी भयभीत झालेल्या शेतकऱ्यांना मुक्ती हवी असते आणि ही मुक्ती फक्त मरणच देईल असा विचार करूनच आत्महत्या हा एकच मार्ग त्याला सापडतो. शेतकऱ्यांचा आत्मा हा जिवंतपणीच यातना भोगून - भोगून मेलेला असतो आणि नंतर शरीर मरते. हे भयानक वास्तव लेखकाने अत्यंत प्रभावीपणे दाखविले आहे.

'बारोमास' मध्ये एका शेतकरी कुटुंबाची शोकांतिका रेखाटली असली तरी लेखकाने समग्र शेतकऱ्यांना डोळयासमोर उभे करून ती शोकांतिका मांडली आहे यात शंकाच नाही. ही शोकांतिका कोणा एका सुभानरावांची नसून आजच्या काळात असे कितीतरी सुभानराव देहत्याग करीत आहेत ही गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे.

सव्वीस एकर शेती असणारे सुभानराव दारिद्रयापायी आत्महत्येचा प्रयत्न करतात. त्यांचा पहिला प्रयत्न असफल झाला असला तरी त्यांचा आत्मा केव्हाच जळून राख झालेला असतो. हे सुभानरावंच्या बोलण्यातून सूचित होते. ते म्हणतात, "ऐरी तरी का मी वाचणार हाये का आता ? काय करू वाचून ? माहं वावर माह्या हातातून गेलं. त्याचा शाप भवून राह्यला मले. तुमी कितीक दिवस ह्या शापातून वाचवणार हाये मले ? आता बंदा डबा रिकामा करील नल्डयात. अन् आशा जागेवर जाईल की तिथं कुत्रंबी येणार नाई ...."[१६] सुभानरावांनी व्यक्त केलेली ही निराश भावना मनाला बोचणारी अशीच आहे.

नैराश्येच्या गर्तेत सापडलेले सुभानराव हे स्वत:चे मरण स्वत:च्याच डोळयांनी स्वप्नात पाहतात असा भासही लेखकाने निर्माण केलेला आहे. कर्ज

वसुलीसाठी सावकार, देणेकरी हात धुवून मागे लागलेले असतात. नापिकी, कर्जबाजारीपणा, भविष्यकाळाविषयीची चिंता, वैफल्य, मुलाने केलेली फसवणूक या व्याधींनी त्रासलेल्या सुभानरावांना स्वप्नात स्वत:चा मृत्यू दिसतो.

"मले सपनात दिसलं: आपल्या सोनखाशीकडचं जांभुळखोरं नाई का .... तिथं पाण्याच्या कुंडाजवळ एक माणूस मरून पडेल व्हता. बहुतेक त्यानं जीवच दिला व्हता. जवळ एंड्रीनचं डबडं, धांद, सम्द सायसंगीन दिसत व्हतं. दाट झाडवनात त्याच मढं .... त कुंडावर ढोरं चारणारे पोरं पाणी प्यायले जातात. अन् म्हन्तात आरे, हा त आपल्याच गावाचा माणूस हाये. चला गावात घेऊन. पोरं त्याले उचलायले पाह्यतात. पण त्यो काई उचलत नाई. मंग एक पोर्ग म्हन्ते, गावात कुत्रं मांजर मेल्यावर मांगाचा कडूबा कशी त्याच्या पायाले दोरी बांधून वढत नेते .... तसेच आपून ह्या धांदीनं त्याचे पाय बांधू अन् वढत वढत गावात नेऊ ...."[१७] त्यांनी स्वप्नात बघितलेला मृत्यू कादंबरीच्या शेवटी सत्यात उतरविला आहे. कादंबरीचा शेवट हा सुभानरावांच्या सूचक आत्महत्येने केलेला आहे, शिवाय शेवंतामाय सर्वांना जांभुळखोऱ्यातल्या कुंडाजवळ जाण्यास सांगते. ही गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते.

शेतकऱ्यांच्या मृत्युनंतरही त्याच्या आत्म्याला आणि देहालासुध्दा सुख लाभत नाही. 'बारोमास' या कादंबरीतून लेखकाने शेतकऱ्यांच्या जीवघेण्या खऱ्या व्यथा या शेतीव्यवसायाच्या मुळाशी जाऊनच कळतात. हाच बोध समग्र वाचकांना दिला आहे. निसर्गाची अवकृपा, श्रीमंताची मक्तेदारी, सावकारी पाश, बाजारपेठा, व्यापाऱ्यांची मनगटशाही, मजुरांची अरेरावी, सरकारचे दुटप्पी आयात - निर्यातीचे धोरण या समस्यांचा महापूर शेतकऱ्यांचे संपूर्ण जीवन उद्ध्वस्त होऊन जाते. सव्वीस एकर शेती असणारा शेतकरी भिकारी होतो तर छोटया शेतकऱ्यांची काय कथा असेल ? दारिद्रय हे शेतकऱ्यांच्या पाचवीलाच पुजलेले असते. या साऱ्या गोष्टी सहनशीलतेच्या पलीकडच्या असतात. शेतकरी हा काही सहजासहजी आत्महत्येचा मार्ग स्वीकारत नसतो. त्याला जिवंतपणीच मरणयातना भोगाव्या लागलेल्या असतात. तो आत्महत्येचा बळी का ठरतो याच्या मूळाशी जाण्याचा एक सकस प्रयत्न लेखकाने केला आहे असे म्हणावयास हरकत नाही.

आपल्या शेतकऱ्यांचे कष्टपद जीवन सुधरावयाचे असेल तर शेतकऱ्यांनी परिवर्तनशील, लवचिक होण्याची गरज आहे. बदलत्या काळानुसार शेतीव्यवसायातही बदल करायला हवा. खेडयात उद्योगधंदे निर्माण करण्यासाठी सरकारनेही खेडयाकडे लक्ष द्यायला पाहिजे. शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविल्या जातात त्या

योजनांचा पुरेपूर फायदा शेतकऱ्यांना होतो की नाही हे पाहणे आवश्यक आहे. तेव्हाच कुठेतरी शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारून दारिद्रयाला खिळ बसेल असा एक आशावादी दृष्टिकोनही लेखकाने बाळगलेला दिसून येतो.

दरिद्री जीवनाला कवटाळत बसण्यापेक्षा त्यावर काही उपाय शोधणे ही आजच्या काळाची गरज आहे. आधुनिकीकरणाला सामोरे जाण्यासाठी शेतकरी वर्गाने पूर्ण सजग व्हायला हवे. जागतिकीकरणाच्या प्रवाहात शेतकरी कसा बुडत चालला आहे हे दाहक वास्तव मांडण्याचा लेखकाने प्रयत्न केलेला दिसून येतो.

अलीकडच्या काही वर्षात सरकार शेतकऱ्यांकडे लक्ष देऊ लागले तरी म्हणावी तितकी शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारली आहे असे मात्र वाटत नाही. आत्महत्येचे वाढते प्रमाण पाहून शेतकऱ्यांना कर्जमुक्ती करण्याचा एक छोटा प्रयत्न सरकार करू लागले आहे. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला सरकारने काही रकमेचे पॅकेज देण्याची योजना राबविली आहे. पण हे पॅकेज त्या शेतकऱ्यांच्या कुटुंबापर्यंत पोहचते का ? ही वेगळीच समस्या निर्माण झाली आहे.

याशिवाय सरकारने कर्जमाफी करून शेतकऱ्यांना मुक्त करण्याचा प्रयत्न केला असला तरी हा प्रयत्न अपुराच आहे. याचा फायदा केवळ मोठया शेतकऱ्यांनाच तेवढा होतो. छोटे शेतकरी मात्र दारिद्रयाच्या गाळातच रूतलेले दिसतात.

सरकारी पॅकेजचा फायदा घेण्यासाठी एखाद्या कुटुंबातील म्हातारा आत्महत्या करून मोकळा होतो. आपले आता किती दिवस उरलेत. आपल्या मरणाने घराचे कल्याण होत असेल तर आत्महत्या करण्यास काहीच हरकत नाही. असा विचार करणारे म्हातारे शेतकरीही समाजात दिसून येतात. ही वाईट प्रवृत्ती आजच्या काळात फार जोमाने वाढू लागली आहे ही फार दुर्दैवाचीच बाब आहे.

सावकाराच्या कर्जाला बेजार होऊन एका शेतकऱ्यांने आत्महत्या केली अशा वर्तमानपत्रातून येणाऱ्या बातम्या विचार करायला लावतात. खरोखराच तो शेतकरी होता का ? शेतीसाठीच त्याने कर्ज काढले होते का ? कारण आजकाल कोणीही कर्जाच्या नावाखाली शेतकरी म्हणून आत्महत्या करू लागला आहे. बळावत चाललेल्या या वाईट प्रवृत्तींचाही विचार करणे महत्त्वाचे ठरते. केवळ एकाच बाजूने विचार चालणार नाही एवढेच म्हणावेसे वाटते.

बारोमासमधील सर्वच व्यक्तिरेखा निराशावादी दृष्टिकोन बाळगूनच जगताना दिसतात. त्यांच्यामध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करायला लेखक कमी तर पडला

नाही ना ? त्यांची पात्रे यशस्वी का होत नाहीत ? सर्वच कसे अपयशी ठरतात ? जीवनाची वाताहत झाली म्हणून आत्महत्या करणे किंवा शेती विकणे इतकेच पर्याय होऊ शकत नाहीत. येणाऱ्या प्रत्येक प्रसंगांना सर्वांनीच धैर्याने तोंड दिले असते, त्यातून योग्य मार्ग काढला असता तर सुभानरावांच्या कुटुंबाची एवढी वाताहत झाली नसती किंवा कादंबरीचा शेवट वेगळाच झाला असता असे वाटते.

येथे आणखी एक गोष्ट लक्षात येते उरलेले एक लाख रूपये भांडवल घालून एकनाथने मोहाडीत छोटा - मोठा व्यवसाय केला असता तरी परिस्थिती बदलली असती. त्याच्या संसाराचीही इतकी शोकांतिका झाली नसती. 'खरचं आता या पैशाचं काय करायचं ?''[१८] या विचारांमध्येच एकनाथ गुंतून पडला आहे. शेती तर सावकाराकडे गेलीच होती. ती काही परत मिळण्याची खात्री नव्हती. एवढे माहीत असूनही सुशिक्षित विचारी असणारा एकनाथ गप्प कसा राहिला. या पाठीमागचे नेमके कारण काय असावे ? या प्रश्नाचे उत्तर अनुत्तरीतच राहिले आहे.

### ❖ भांडवलशाही आणि पारंपरिक कृषिव्यवस्था: -

आपला भारत देश कृषिप्रधान देश आहे. ७0% लोक खेडयात राहून शेती व्यवसाय करतात. स्वातंत्र्य प्राप्ती होऊन ६0 वर्षे उलटून गेली असली तरी शेतकऱ्यांची प्रगती झाली आहे असे मात्र खात्रीशीरपणे म्हणता येणार नाही. एकेकाळचा शेतकरी खाऊन - पिऊन सुखी पहावयास मिळत होता पण आजची परिस्थिती याउलट झालेली दिसून येते. शेतकरी दु:खी जीवन का जगतोय ? त्याला जबाबदार असणारे घटक कोणते ? यावर काही उपाययोजना नाहीत का ? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. ढोरांसारखा राबणारा शेतकरी निराशामय जीवन जगतोय ही वस्तुस्थिती आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना लेखकाने वाचा फोडण्याचे कार्य 'बारोमास' या कलाकृतीतून केले आहे.

आजचे युग हे भांडवलशाहीचे युग आहे. व्यापाऱ्यांच्या खुल्या धोरणाला आणि जागतिकीकरणाच्या महालाटेला सामोरे जाण्यासाठी प्रत्येकाकडे पुरेसे भांडवल असणे आवश्यक असते. कोणताही उद्योगधंदा करण्यासाठी भांडवलाची आवश्यकता असते. मात्र 'शेती' हा असा एकच व्यवसायधंदा आहे की, शेती करणाऱ्या शेतकऱ्यांजवळ शेतीत घालण्यासाठी पुरेसे भांडवल कधीच नसते. भांडवलाची कमतरता असल्याने तो शेतीत प्रगती करू शकत नाही. शिवाय आधुनिक पध्दतीनेही शेती करू शकत नाही. त्याला पारंपरिक पध्दतीनेच शेती करावी लागते. भांडवलशाहीमुळे शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त होत असते. ही वस्तुस्थिती लेखकाने

'बारोमास' मध्ये चित्रित केली आहे. या कादंबरीत शेतकऱ्यांच्या ज्वलंत समस्या मांडलेल्या दिसून येतात. दुर्लक्षित झालेला शेतकरी हा रसातळाला गेलेला दिसून येत आहे. शेतकरी हा सतत कडकीत जीवन जगणारा असा एक वर्ग आहे याचा गांभीर्याने विचार करणारी 'बारोमास' ही कलाकृती वाचकाचे लक्ष वेधून घेते.

शेतीव्यवसाय करताना प्रथम शेतकऱ्यांला पदरमोड करावी लागते. हे जरी खरे असले तरी शेतकऱ्यांकडे कधीच भांडवल शिल्लक नसते वेळप्रसंगी तो घरातील स्त्रियांचे दागिने मोडतो, बँकांचे, सावकारांचे कर्ज काढून शेती व्यवसाय करत असतो. आर्थिक तंगी असलेला शेतकरी चिंतेशिवाय काहीच करू शकत नाही.

विदर्भातील एका शेतकरी कुटुंबाची वाताहत होते. या वाताहतीच्या अनेक कारणांचा शोध लेखकाने घेतला आहे. त्यापैकी एक कारण म्हणजे भांडवलशाही. पेरणी करण्यासाठी या शेतकऱ्यांजवळ भांडवल नसते म्हणून आपल्या सुनेचे दागिने मोडून पेरणीचा हंगाम पुरा पाडलेला असतो. एवढयावरच ही गोष्ट संपत नाही तर पुढच्या खर्चासाठी एखादा श्रीमंत सावकार गाठावाच लागतो. सावकाराकडून पाच टक्के दहा टक्के रूपयांनी कर्ज काढून भांडवल उभे केलेले असते. दुर्दैवाने हंगाम तोटयातच जातात आणि कर्जाची रक्कम थकत जाते. कर्जाचा महाडोंगर होतो. या कर्जाच्या डोंगराखाली शेतकरी दबला जातो. त्यातून तो काही पुन्हा वर येत नाही. ही गोष्ट विचार करायला भाग पाडते.

आर्थिक महासत्ता बनू पाहणारा आपला देश शेतकरीवर्गाकडे मात्र अजूनही दुर्लक्ष करीत आहे. ही फार मोठी चिंतेची बाब आहे. आपल्या देशातील राजकीय नेते, पुढारी मायबाप सरकार शेतकऱ्यांना नेहमीच डावलताना दिसतात. दिवसेंदिवस शेतकऱ्यांला भयाण परिस्थितीशी संघर्ष करीत जीवन जगावे लागते. यातूनच शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढत चालले आहे हे कटू सत्य नाकारता येत नाही. तथापि फसवे सरकार, ढोंगी राजकीय पुढारी शेतकऱ्यांना धीर देण्याचा दिखावा करतात, आश्वासनाचा पाऊस पाडतात. पण प्रत्यक्षात मात्र एकही आश्वासन पूर्ण झाल्याचे कोठेच दिसत नाही. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचा फोटो, त्याच्या कुटुंबाचे फोटो, उद्‌ध्वस्त झालेल्या त्याच्या घराचे फोटो चार दिवस वर्तमानपत्रात पहिल्या पानावर झळकताना दिसतात. पण पुन्हा मात्र या कुटुंबाकडे कोणताही पुढारी किंवा सरकार ढुंकुनही पहात नाही. या बाबीचा कोणीसुध्दा गांभीर्याने विचार करताना दिसत नाही.

शेतकरी हा कृषिसंस्कृतीशी निगडित असा महत्त्वाचा घटक आहे. 'बारोमास' या कलाकृतीमध्ये कृषिपरंपरेचे सूक्ष्म बारकाव्यानिशी केलेले चित्रण अधिक भावणारे

आहे. कृषिनिष्ठ जीवनाची जाणीव लेखकाला असल्याने कुठेही कृत्रिमता जाणवत नाही. बदलत्या काळाला सामोरे जाणारी 'बारोमास' ही कलाकृती पारंपरिक कृषिव्यवस्थेबरोबर आधुनिक कृषिव्यवस्थेचाही स्वीकार करते. कादंबरीच्या प्रारंभीच आपल्याला पारंपरिक कृषिपरंपरेचे दर्शन घडवते.

आजच्या बदलत्या काळात आधुनिक शेती करणे योग्य का ? पारंपरिक पध्दतीने शेती करणे योग्य ? या प्रश्नावर दोन पिढयांमध्ये चाललेला संघर्ष आपणास पहावयास मिळतो. जुन्या वृध्द पिढीला पारंपरिक शेतीचे महत्त्व वाटते तर नव्या पिढीला आधुनिक शेतीपध्दतीचे आकर्षण असते. बदलत्या काळाप्रमाणे खेडयाचे रूपही पालटून गेले आहे. या बदलणाऱ्या काळाचा, पध्दतीचा स्वीकार करताना जुन्या पिढीला जड जात असते. हेच येथे दिसून येते. याठिकाणी दोन पिढयातील संघर्ष वाचकांचे लक्ष वेधून घेणारा आहे.

नानूआजा ही व्यक्तिरेखा जुन्या पिढीचे त्याचबरोबर पारंपरिक कृषिसंस्कृतीचे प्रतिनिधित्व करत असते तर एकनाथ हा आधुनिक काळाचा प्रतिनिधी म्हणून लक्षात राहतो. आपल्या काळया आईवर दोघांचीही मनापासून श्रध्दा आहे. शेती हा आपला श्वास मानून जीवन जगत असतात. परंतु नानूआज्यासारख्या जुन्या पिढीला तडजोड मान्य नाही हे खालील उद्‌गारावरून लक्षात येते.

"हे हाब्रीड तुमचंबी हाब्रीड करंल एक दिवस. आरे पीक व्हते म्हन्ता बदबद. पण त्यो नुस्ता भपका. दिसायले देखावा"[१९]

नानूआज्याला हा बदल मान्य नसतो. तो पारंपरिक कृषिपरंपरेला चिकटून बसलेला दिसून येतो. नानूआज्याच्या दृष्टीने शेतीला जीव असतो. तिच्यावर अन्याय केला तर ती जास्त काळ उत्पन्न देणार नाही. हा त्याचा विचार एका दृष्टीने योग्यच वाटतो. त्याच्या पारंपरिक कृषिव्यवस्थेविषयीच्या भावना मनाला स्पर्शून जातात. तो म्हणतो, "शाप लागलं तुमाले या भुईचा. आरे ती दिसायले निरजीव आसली तरी जीव आस्ते तिले. तवाच त पोट पिकती ती. पण तिच्यावर आसा अत्येचार केल्यावर किती दिवस दम धरणार हाये ती ?"[२०] त्याची ही तळमळ किती मनापासूनची आहे याची प्रचिती येते.

शेतकरी कुटुंबात तीन पिढयांचा वैचारिक संबंध पहावयास मिळतो. नानूआजा पारंपरिक कृषिपरंपरेपासून अलग होण्यास तयार नसतो. सुभानराव मात्र हळूहळू हा बदल स्वीकारायला तयार झालेले असतात तर एकनाथसारखा सुशिक्षित विचारी शेतकरी आधुनिक पध्दतीने शेतात काही प्रयोग करून आधुनिक शेतकऱ्यांचे

प्रतिनिधित्त्व करीत असतो.

शेतकऱ्याचे घर जसे असायला हवे तसेच लेखकाने शेतकऱ्यांचे घर उभे केले आहे. लेखक हे सारे चित्रण करताना कुठेही कमी पडलेला दिसत नाही. सुभानराव या शेतकऱ्यांचे घर माळोदाचे असते. मातीच्या भिंती असणाऱ्या घराला दोन फळयाचे दार असते. घरामागे गुरांचा गोठा असतो. या गोठयात प्राण्यांचा गोतावळा असतो. चार बैले, एक गाय, एक म्हैस, एक मांजर आणि घरातील माणसे यांचे मिळून एक शेतकरी कुटुंब चित्रित केले आहे. या चित्रणातून खराखुरा शेतकरी पहावयास मिळतो. शेतकऱ्यांशी निगडित असणाऱ्या प्राण्याशिवाय शेतकऱ्यांच्या घराला पूर्णत्व प्राप्त होत नाही. स्वत:च्या जीवापेक्षाही प्राण्यांवर निरपेक्ष प्रेम करणारा शेतकरी येथे दिसतो.

एकविसाव्या शतकात जग हे कितीही पुढे गेले असले तरी आजच्या ग्रामीण भागात काही जुन्या पारंपरिक चालीरीतीना पूर्वीइतकेच महत्त्व असते. त्या पारंपरिक चालीरीती जतन करण्यासाठी ग्रामीण माणूस धडपडत असतो. शेतातील कामाचा प्रारंभ ही देव - देवतांची पूजा करून केला जातो. शेतीसाठी लागणाऱ्या सर्व अवजारांची मनोभावे पूजा केली जाते येथे आपल्या कृषिपरंपरेचे दर्शन घडते.

पारंपरिक कृषिसंस्कृतीवर आधुनिक संस्कृतीने मात केली आहे असे मानले जात असले तरी शेतकऱ्यांची परिस्थिती मात्र फारसी बदलली नाही ही बाब तितकीच सत्य आहे. म्हणूनच की काय आबाजीसारखा जुन्या पिढीतील हाडामासाचा शेतकरी नव्या पिढीला पारंपरिक शेतीचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न करतो. आजच्या काळाविषयी त्याच्या बोलण्यातून एक प्रकारची खंत जाणवते. उन्हाळा, पावसाळा असो की सणवार शेतकऱ्यांने एक चक्कर तरी शेतात मारणे आवश्यक असते. पूर्वी सारख्या खळयावर धान्याच्या राशी दिसत नाहीत. खळयाचं पूजन कोणी करीत नाही. रात्री तर दूरच पण दिवसाही शेताकडे कोणी जात नाही. काळ बदलला तसे सारे बदलून गेले. पूर्वी गावात वासुदेवाची फेरी आली की शेतातल्या कामावर जाण्याची तयारी असे. पाऊस पडताच शेतात मुक्काम असे. शेतातील सुगी संपेपर्यंत शेतात शेतकरी रहात असे. शिमग्याच्या वेळी नांगरट करून खत टाकल्याने एक - एक ज्वारीचे कणीस मुंडक्यासारखे तर ताट ऊसासारखे येत असे. मिरची वाळली तर आग लागल्यासारखे भासे तर कापूस फुटला तर ढग खाली उतरल्यासारखे वाटत असे. येथे पारंपरिक कृषिपरंपरेचे महत्त्व वृध्दांच्या मनोगतातून लेखकाने पटवून दिले आहे.

पहिला पाऊस पडताच शेतकऱ्यांची कशी तारांबळ उडते. पेरणीसाठी औतफाटयाची दुरूस्ती केली जाते याचे हुबेहूब चित्रण करण्यात लेखक यशस्वी झाला आहे. "दावणीला चार बैलं असणाऱ्या सुभानरावने दोन बैल असलेल्या तुळशीराम

पाटलाशी सायड केली होती. तुळशीराम पाटील तिफण हाणायचा एकनाथ कमरेला बियाण्याची ओटी बांधून चाडयावर मूठ पेरायचा. सुभानराव अन् कामावरचा खंडू रासण्या मोडायसाठी तिफणीच्या मागे वखर हाणायचे"[२१] आज मात्र ही पध्दत अगदी कमी प्रमाणात दिसते.

पावसाच्या अभावी पीके जळून जातात. दुबार पेरणीच्या धास्तीने शेतकरी बेजार होतो. दुबार पेरणी करण्यासाठी लागणारे भांडवलच त्याच्याकडे शिल्लक नसते. साऱ्या शेतकरी वर्गाची एकच स्थिती झालेली असते. हे सारे शेतकरी बिन भांडवलाचेच धनी असतात. एकमेकांना मदतीचा हातही देऊ शकत नव्हते. परिस्थितीने दुबळा विकलांग झालेला शेतकरी केंद्रस्थानी मानून त्याची अगतिकता, त्याचा जीवनसंघर्ष 'बारोमास' मधून रेखाटला आहे. सृजनशील मनाने घेतलेला हा संघर्ष मनाला काटयासारखा सलून जातो. भांडवलाअभावी शेतकरी कसा तळमळत आहे याचे भान खालील संदर्भावरून येते.

"आता काय सांगू बेटा तुले ? आमच्याबी भागात तीच गत झाली. फरक येवढाच की तुमी जात्यात हाये, आमी सुपात हाये. तुवा त पाह्यलंच आसल एस. टी. तून आमचं शिवार कसं होरपळून राह्यलं ते. पेरणी झाल्यावर फक्त एक शिपक झिडकावा पल्डा, तवापासून आजून पाण्याचा पत्ता नाई"[२२] येथे सुभानरावांना आपल्या लेकीला मदत करण्याची इच्छा असूनही पैशावाचून त्यांना काहीच मदत करता येत नाही याचा सल त्यांच्या मनाला लागून राहिला आहे.

एकनाथसारखा हुशार तरूण शेतीत नवनवीन प्रयोग करण्याचा प्रयत्न करतो. आधुनिक शेती पध्दतीने शेती करण्याचे कितीवेळा तरी ठरवित असतो. शेतात फळबागा लावून भरघोस उत्पन्न काढण्याचे त्याचे स्वप्न भांडवलावाचून कधीच सत्यात उतरत नाही. दुबार पेरणीसाठी भांडवल गोळा करता - करता शेतकरी थकून जातो. पुन्हा नवीन कर्ज, बी - बियाणे याचा मेळ घालता - घालता त्याच्या नाकी दम येतो. शेतीला पूरक व्यवसाय करण्याची इच्छा असूनही भांडवलावाचून ते व्यवसाय करू शकत नाहीत. एवढाच विचार करून थांबावे लागते. शेतकऱ्यांच्या प्रगतीचे सारे मार्गच खुंटलेले असतात.

आजचा काळ कितीही आधुनिक असला तरी शेतकऱ्यांचे आपल्या काळया मातीवर असणारे प्रेम तसूभरही कमी होत नाही हे एकनाथच्या व्यक्तिरेखेवरून लक्षात येते. या शेतकऱ्यांचे आपल्या प्राण्यांवर, शेतावर, झाडाझुडपांवर तितकेच प्रेम असते जितके तो आपल्या कुटुंबावर करतो. मातीशी, तिथल्या पीकाशी जडलेले नाते इतके परिपक्व झालेले असते की डोलणारी पीके पाहून मन आनंदून जाते. पावसाअभावी

जळणाऱ्या पिकांकडे पाहून त्याचे मन गहिवरून जाते. शेतकऱ्यांच्या या केविलवाण्या अवस्थेचे जिवंत चित्रण केले आहे यात शंकाच नाही. "....ज्या शेतात तिफणीमागे चालंत चाडयावर मूठ धरून मी पेरणी केली, त्या तासातली पिकं तासी लागण्याऐवजी रोपं असतानाच जळून जाताना पाहून माझ्या काळजात आग लागते. म्हणून जावंच वाटत नाही वावरात"[२३] ही शेतकऱ्यांची तगमग काळजाला कापत जाते.

पुन्हा पाऊस पडताच शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज काढून पेरणी करावी लागते. दुकानदार या शेतकऱ्यांना दारात उभेसुध्दा करीत नाही. दगडू महाकाळसारखा भांडवलशहा कमी दरात खरेदी करून आणलेला शेतमाल कंपन्यांना अधिक दराने विकून लाखो रूपये कमावतो. शेतकऱ्यांकडून कोऱ्या स्टॅम्प पेपरवर सह्या घेतो मगच बियाणे देतो. येथे भांडवलशाहीचाच विजय होतो.

लेखक हा स्वत: शेतकरी कुटुंबातील असल्याने त्याने कृषिपरंपरेचे चित्रण मूर्तिमंत असेच उभे केले आहे. शेतकऱ्यांना लागणाऱ्या प्रत्येक अवजाराशी लेखक परिचित आहे. तिफण, चाडं, बारदाणा ही शेतकऱ्यांची संपत्ती असते. शेतातील कामाचे चित्रण लेखकाने अगदी तपशीलवारपणे केले आहे. पेरणी, निंदणी, खुरपणी, कापणी, मळणी, कापूस वेचणी ही शेतकऱ्यांची नित्याची कामे असतात हे अगदी सहजपणे लेखक सांगून जातो. शेती आणि शेतकऱ्यांचा घनिष्ठ असा संबंध असतो. सुकणारी पीके पाहून जसे त्याचे मन गहिवरते तसे डोलणारी पीके पाहून मन आनंदित होते याची प्रचिती खालील संदर्भावरून येते.

"मुगउडदाच्या पिकाला एकावर एक दोन डवरणीच्या पाळया बसल्या. फुलं - वाद्या झोंबून आल्या. कपाशीचं पीकही बाळसं धरून चांगलं गोंडाळून आलं हायब्रीड ज्वारी धांडे शेलपानात आले. सगळ शिवार हिरवंगार दिसू लागलं. पाऊस पाहिजे तसा पडत होता. त्यामुळे बांध - बांधाऱ्याने हिरवं गवत सळसळू लागलं. गुरा - ढोरांची पोट भरलेली दिसू लागली."[२४] यावरून शेतकऱ्यांच्या नसानसात शेतीजीवन भरले आहे असे म्हणावे लागेल.

पण क्रूर नियतीच्या मनात काहीतरी वेगळेच होते. हवा - हवासा वाटणारा पाऊस क्षणभरात शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त करून जातो. सारी पीके नष्ट होतात. शेतकऱ्यांच्या हाती काहीच लागत नसते. तोटयात जाणाऱ्या या शेतीवर असणारे शेतकऱ्यांचे प्रेम हे कधीच आटत नसते हे सुभानरावसारख्या कष्टाळू शेतकऱ्यांच्या बोलण्यातून सूचित होते. ते म्हणतात, "....माहा किती जीव हाय त्या मळयात. त्या इहिरीत. महाशिरा झऱ्याची तळपाणी आसणारी इहिर हाये जसं ती ....आशी

इहिर कोणाच्या नशिबात आस्ती ? आरे मले पाणी द्या .... हवा येऊ द्या. जीव घायबरून राह्यला म्हा.... घबराट सुटली मले....."[२५] यावरून शेतकऱ्यांचे पाय या मातीतच घट्ट रोवून बसलेले असतात याची आपणास कल्पना येते.

पूर्वीच्या काळी खळयावर मळणी करणारा शेतकरी आणि आजच्या काळी यांत्रिक पध्दतीने मळणी करणारा शेतकरी यामध्ये तफावत दिसून येते. काळ जसा बदलला तशा साऱ्या गोष्टीही बदलल्या. आजच्या काळात यांत्रिकीकरणाच्या युगात काळाप्रमाणे शेतकऱ्यांनाही बदलणे आवश्यक असते. असे असले तरी गरीब शेतकरी आजही बैलांकरवीच शेती करताना आढळतात. ट्रॅक्टरसारख्या यंत्राचे भाडे देण्यासाठी त्याच्याजवळ पुरेसे पैसे नसतात. फक्त नावानेच शेतकरी असणारे शेतकरी ट्रॅक्टरचाच उपयोग करीत असतो. पारंपरिक आणि आधुनिक कृषिपरंपरा या दोन्हीच्या संघर्षात सापडलेल्या शेतकऱ्यांचे दर्शन 'बारोमास' ने घडविले आहे. पारंपरिक कृषिव्यवस्था ही मनाला गारवा देणारी असली तरी बदलत्या काळानुसार आधुनिक शेतीचीही गरज आहे. हा विचारसुध्दा लेखकाने प्रभावीपणे मांडला आहे.

भांडवलशाहीच्या जोरावर दुकानदार, व्यापारी, सावकार शेतकऱ्यांना राजरोसपणे लुबाडत असतात. सरकारने शेतकऱ्यांसाठी दिलेली 'सबसिडी' हे दुकानदार, व्यापारी स्वत:च खिशात घालतात. सबसिडी घेण्यासाठी अगोदरच काही पैसे भरावे लागतात आणि हेच पैसे शेतकऱ्यांकडे नसतात. मग हे दुकानदार शेतकऱ्यांच्या नावावर पैसे भरतात आणि या सर्व सबसिडीचा लाभ स्वत: घेतात. शेतकऱ्यांना त्याचा मागमूसही नसतो. शेतकऱ्यांची फसवणूक करून हे श्रीमंत व्यापारी आणखी गलेलठ्ठ होतात. दगडू महाकाळसारखा श्रीमंत सावकार भांडवलशाहीच्या जोरावर कर्जदार शेतकऱ्यांवर जबरदस्ती करून आपला हेतू साधून घेतात हे वास्तव लेखकाने उघडपणे मांडलेले आहे.

सारांश, आजही आपल्या देशात भांडवलशाही उफाळून आलेली दिसते. म्हणूनच श्रीमंत सावकार हा अतिश्रीमंतीत लोळण घेत आहे आणि गरीब शेतकरी दारिद्र्यात लोळत आहे. शेतकऱ्यांची ही विवशता आणि परवशता मनाला अत्यंत अस्वस्थ करून जाते.

सरकारने शेतकऱ्यांच्या सुधारणेसाठी अनेक योजना राबवल्या असल्या तरी त्या योजना शेतकऱ्यांच्या डोळयात धूळफेक करणाऱ्या अशाच आहेत. या योजना कागदोपत्री अंमलात आणण्यात सरकारी कर्मचारी यशस्वी झालेले असतात. त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र कोठेच झालेली दिसत नाही. या योजनांचा लाभ

शेतकऱ्यांपर्यंत पोहचतच नाही. मधल्या - मध्येच हडप केल्या जातात. हा भ्रष्टाचार एक शिष्टाचार मानला जात आहे. या भ्रष्टाचारी कारभारावर लेखकाने भाष्य तर केलेच आहे पण समाजाला आणि सरकारला खडबडून जागेही केले आहे.

शेतकऱ्यांचे ज्वलंत प्रश्न, त्यांच्या व्यथा - वेदना यांचा गांभीर्याने विचार करायला भाग पाडणारी 'बारोमास' ही कादंबरी भूतकाळाची नोंद करणारी, वर्तमानात जगायला लावणारी आणि भविष्यकाळाची चाहूल घेणारी कादंबरी म्हणून जास्त ओळखली जाते. या कादंबरीने विविध टप्पे पार करून एक उच्च पल्ला गाठला आहे असे म्हणणेच योग्य वाटते.

**❖ शेतकऱ्यांचे सावकारांकडून होणारे आर्थिक व मानसिक शोषण: -**

शेतकरी हा ग्रामीण जीवनाचा अविभाज्य घटक मानला जातो. या शेतकऱ्यांच्या कष्टावर सारे जग जगत आहे. पण हा शेतकरी कायम विवंचनेत दिसतो याचे कारण काय ? आपला देश स्वतंत्र होऊन इतकी वर्षे झाली तरी आपल्या देशातील शेतकरी हा स्वतंत्र झाला आहे का ? या सर्व परिस्थितीला जबाबदार असणारे घटक कोणते ? याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न 'बारोमास' या कादंबरीने केला आहे.

वर्षानुवर्षे शेतकऱ्यांच्या आयुष्याची पडझड झाली आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही कृषिव्यवस्थेवर आधारित असूनही शेतकरी वर्गाला पायदळी तुडवले जात आहे. पूर्वीपासून आपल्या देशात शेतकरी हा कर्जाच्या ओझ्याखाली दबला जाई ल अशीच व्यवस्था केलेली दिसून येते. तो सतत तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करीत असतो. आपली समाजव्यवस्था ही निर्दयपणे शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण तर करतच असते पण मानसिक शोषणही करीत असते.

इंग्रजांच्या काळात शेतकऱ्यांवर वेगवेगळे कर लादून लुबाडले जात होते तर आजच्या काळात सावकार, सरकारी अधिकारी, शैक्षणिक संस्था, भोंदू शेतकऱ्यांना लुबाडत असतात हे भयाण सत्य लेखकाने वाचकांसमोर मांडले आहे. आजचा शेतकरी सावकारी पाशातून मुक्त केला आहे असे कितीही सरकारने कांगावे केले असले तरी त्यात तथ्य किती आहे याची उकल 'बारोमास' ने करून दिली आहे. जुलमी समाजव्यवस्थेच्या चाकात शेतकरी भरडला जात आहे याला अनेक घटक जबाबदार आहेत त्यापैकीच एक महत्त्वाचा घटक म्हणजे सावकारी पाश हा होय.

आजच्या काळात वर्तमानपत्र उघडताच रोज एका तरी शेतकऱ्यांने आत्महत्या केली अशी बातमी पहावयास मिळते. या शेतकऱ्यांने आत्महत्या का केली ? याचे कारण शोधता 'कर्जबाजारीपणा' मुळे त्याने आत्महत्या केली असे स्पष्ट होते. काही

दिवस त्याच्या आत्महत्येवर चर्चा होत असते. कुणी या आत्महत्येला भ्याडपणा समजते तर कुणी नशीब समजते. त्याच्या आत्महत्येतून बऱ्याच गोष्टी उजेडात येतात. लेखकाने शेतकरी आत्महत्येचा बळी का ठरतो याचा शोध घेण्याचा प्रयत्न बारोमासमधून केलेला आहे.

आजच्या शेतकऱ्याची परिस्थिती महाभारतातल्या अभिमान्युसारखी झाली आहे. शेतकरी हा निसर्ग, सरकारचे आयात - निर्यातीचे धोरण, जागतिकीकरण, मिश्र अर्थव्यवस्था, शिक्षणाचे झालेले बाजारीकरण, भांडवलशाही, सावकारी पाश या चक्रव्यूहात सापडला आहे. या चक्रव्युहाचे कवच भेदून बाहेर पडण्याचा मार्गच त्याला सापडत नाही. सगळीकडे अंधारच झालेला दिसतो. या चक्रव्युहातच त्याचा मृत्यू होतो. ही वस्तुस्थिती आहे.

शेतकऱ्यांने आत्महत्या केली की आपले सरकार मृत व्यक्तीच्या कुटुंबाला मदत म्हणून पैशाचे पॅकेज देते. पण हे पॅकेज त्यांच्यापर्यंत पोहचेलच याची खात्री देता येत नाही. या तात्पुरत्या दिल्या जाणाऱ्या डोसाने शेतकऱ्यांचे दुखणे बरे होणार नाही ही गोष्ट विसरून चालणार नाही. शेतकऱ्यांचे खरे दुखणे मुळापासून नष्ट करण्यासाठी योग्य ते औषध देऊन दुखण्यातून कायमची सुटका करणे गरजेचे आहे.

शेतकरी वर्गाला केवळ श्रीमंत असणारे सावकारच लुटतात असे नव्हे तर शासकीय कर्मचारी, व्यापारी, शिक्षण संस्था, मजुरलोक, भोंदू प्रत्यक्ष - अप्रत्यक्षपणे लुटत असतात. हे सारेजण शेतकऱ्यांचे केवळ आर्थिक शोषण करत नसतात तर मानसिक शोषणही करत असतात. कोणी शेतकऱ्यांची न्याय्य बाजू घेताना दिसत नाही. व्यापारी, शिक्षणसंस्थाचालक, सरकारी कर्मचारी हेसुध्दा एक प्रकारचे सावकारच बनलेले असतात. हा सावकारी विळखा शेतकऱ्यांच्या आयुष्याभोवती चांगलाच घट्टपणे आवळलेला दिसून येतो.

दिवसरात्र शेतकरी कष्ट उपासून आपल्या मुलांना शिकवितो पण दुर्दैवाने पैशाअभावी त्या मुलांना नोकरी लागत नाही तेव्हा ही सुशिक्षित मुले गैरमार्गाला लागतात. 'बनुबा' सारख्या भोंदूच्या नादी लागून पैशाच्या लोभापायी चोऱ्या करतात. गुप्तधन शोधण्यासाठी एका - एका रात्रीचे पाचशे रूपये त्या बनुबाला द्यावे लागतात. गुप्तधन मिळेल या आशेवर हे सर्वजण त्याला पैसेही देतात. हीसुध्दा एक प्रकारची केलेली आर्थिक लूटच असते. ग्रामीण भागातील अंधश्रध्देच्या नावाखाली होणाऱ्या आर्थिक शोषणाचे चित्रण लेखकाने अत्यंत चातुर्याने केले आहे.

'सरकारी काम आणि थोडे दिवस थांब' या गतीनेच आज सरकारी कामे

चाललेली दिसून येतात. सरकारी कर्मचाऱ्यांचा हात ओला केला तरच काम लवकर होते अन्यथा केवळ वाटच पहावी लागते. शेतकरी ज्या सरकारला आपले मायबाप मानतो त्या सरकारचे अधिकारी मात्र या गरीब शेतकऱ्यांचे आर्थिक तसेच मानसिक शोषणही करतात. कर्ज काढण्यासाठी लागणारी कागदपत्रे काढता - काढता शेतकरी मेटाकुटीला येतो. शेतकऱ्यांना घरपोहोच सातबारा योजना सरकारने काढली असली तरी हे कर्मचारी ती योजना अंमलात आणत नाहीत. या उलट शेतकऱ्यांवर जणू काही उपकारच करीत आहेत अशा अविर्भावात ते वागत असतात. या कर्मचाऱ्याविरूध्द ते तक्रारसुध्दा करू शकत नाहीत. सातबारा काढण्यासाठी प्रत्येकवेळी तलाठयाची गरज असते म्हणून मूग गिळून शेतकरी गप्प बसतो. पण हे शेफारलेले कर्मचारी कोणतीच कागदपत्रे मोफत देत नसतात. या उलट शेतकऱ्यांकडून पाच - पन्नास रूपयांची लाच घेऊन त्यांचे मानसिक शोषणही करतात. अशा तऱ्हेने मोफत सातबारा योजनेची विल्हेवाट लावली जाते.

"त्याले माईत नवतं साहेब तुमच्या फीचं."

"आसं कसं माईत नवतं ? कोणत्या जमान्यात राह्यता तुमी! आता देऊन त देले पण तेच आधी देले आस्ते त कशाले एवढे हेलपाटे बसले आसते ? अन् आमची त अशी रीत हाय की, आमचा खिसा गरम झाल्याबगर त आम्ही ब्रहमदेवालेबी सात - बाराचा उतारा देत नाई. ऐरीची गोष्ट आलक हाये. पण आता घोंगड आडकेलं हाय नं तुमचं ? ते त जरा ध्यानात घ्या का नाई ? कर्ज काढायच. पैसा उचलायचा मग आमचेबी हात जरा वल्ले केले त कुठी काय बिघडतं, आसं म्हन्तो मी.... बरोबर हाये नं ? आता बँकेवालेबी कोंबडा पार्टी घेतल्याबगर केस मंजूर करत नाईत. आमी का कोंबडा मांगतो ? चहापाण्याची सोय झाली बस झालां."[२६]

सरकारी कर्मचाऱ्याना सरकार पगार देत असूनसुध्दा पैशाच्या हव्यासापोटी गरीब शेतकऱ्यांना लुबाडतात. स्वत:च्याच हातानी लाच घेऊन उर्मटपणाही बेजबाबदार असणारे हे कर्मचारी करतात. लाच घेणे बेकायदेशीर असूनसुध्दा या भ्रष्टाचारी लोकांना त्याचे काहीच भान उरलेले नाही. सरकारी कर्मचाऱ्यांची ही लोचट व आशाळभूत हीनवृत्ती त्यांच्या लोभी व लालचीपणाची निदर्शक आहे. याची जाणीव वरील संवादातून लेखकाने करून देऊन या भ्रष्टाचारी लोकांच्या साळसूदपणाचा बुरखा काढून टाकला आहे. शिवाय या भ्रष्टाचारी कर्मचाऱ्यांच्या वर्तणुकीवर नेमकेच बोट ठेवले आहे.

कर्ज काढणे ही शेतकऱ्यांच्या जीवनातील नित्याचीच बाब झाली आहे. पेरणीपासून उत्पन्न निघेपर्यंत शेतकरी कर्जामध्ये डुबलेला असतो. याशिवाय उत्पन्नही

चांगले निघालेले नसल्याने काढलेले कर्जसुध्दा फिटत नाही. हे कर्ज दिवसेंदिवस वाढतच जाते. शेतकऱ्यांच्या पाठीवर कर्जाचा डोंगर झालेला असतो. आधुनिक पध्दतीने शेती करणारे रावसाहेब हे प्रगतशील शेतकरी होते. आधुनिक शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करणारे रावसाहेबसुध्दा सावकारी पाशाचे बळी ठरतात. शेतकरी छोटा असो वा मोठा त्याच्या वाटयाला वेदनाच आहेत असे निश्चितपणे म्हणावेसे वाटते.

'रावसाहेब' या शेतकऱ्यांने 'बालूशेठ' नावाच्या सावकाराकडून कर्ज काढले होते. या शिवाय बँकेचेही कर्ज थकले होते. बालूशेठ सावकार म्हणजे शेतकऱ्यांचा कर्दनकाळच असतो. सावकार कर्ज देताना शेताचे खरेदीखत जबरदस्तीने करून घेतात. एखाद्या शेतकऱ्यांने नकार दिल्यास त्याचा मानसिक तसेच शारीरिक छळ गुंडाकरवी करतात. रावसाहेबही या जुलमी अत्याचारातून सुटले नाहीत. रात्रभर एका तळघरात कोंडून त्यांना मारझोड केली जाते. तेथून कशीबशी सुटका करून येतात आणि गळफास घेऊन आत्महत्या करतात. ही आत्महत्या केवळ रावसाहेबांची नसून अशा कितीतरी शेतकऱ्यांची आत्महत्या होत असते हे वर्तमानकालीन सत्य नाकारता येणार नाही. रावसाहेबासारख्या विचारी शेतकऱ्यांने आत्महत्या करून स्वत:चे जीवन संपवलेले असते. पण घरातील कर्त्यासवरत्या व्यक्तीच्या मृत्यूने सारे कुटुंब उद्‌ध्वस्त होते हे तितकेच सत्य आहे. 'राजू, आक्का, आक्काच्या दोन पोरी उपटून फेकलेल्या ज्वारीच्या कोमटया सारख्या झरझर सुकून गेल्या होत्या.'[२७]

पैशापुढे माणसाचे काहीच चालत नाही. माणसापेक्षा पैसा श्रेष्ठ झाला आहे. रावसाहेबाच्या मृत्यूचा बदला बालूशेठकडून घ्यावयाचा असे म्हणणारे त्यांचे सख्खे भाऊ हात झटकून मोकळे होतात. शेवटी कोणी कोणाचे नसते हेच खरे. या सावकारी पाशाचा बळी ठरलेले रावसाहेब यांनी आत्महत्या केली असली तरी प्रत्यक्षात त्याच्याकडे कोणताच कागदोपत्री पुरावा नसतो. शिवाय सावकाराने पैशाने पोलीसांना आपल्या खिशात ठेवलेले असते. पोलीस येऊन केवळ चौकशीचा दिखावा करतात. चोपडे ठाणेदाराला बालूशेठ विकत घेतो. एक लाख रूपये देऊन हे प्रकरण तिथेच दाबून टाकतो. येथे लाच देणारा आणि लाच घेणारा हे दोघेही कायद्याच्या दृष्टीने अपराधी असले तरी त्यांचा गुन्हा सिध्द होत नसल्याने ही माणसे समाजात प्रतिष्ठित माणसे म्हणून ओळखली जातात हे फार मोठे दुर्दैवच म्हणावे लागेल.

शेतकरी म्हणून जीवन जगताना काय यातना भोगाव्या लागतात हे केवळ पिंडाने शेतकरी असणाऱ्यालाच माहीत असतात. या यातना खालील वर्णनावरून लक्षात येतात.

'निव्वळ शेतीवर अवलंबून असणारा हा जातवान शेतकरी नंतर आभाळाच्या

लहरीपणाने जेरीस आला. खर्चाची तोंडमिळवणी करता करता कर्जबाजारी झाला. बँकेच कर्ज तुंबलं म्हणून त्याला बाल्याचं कर्ज काढावं लागलं आणि शेवटी अपमानाचं जगणं असह्य होऊन फाशी घेऊन मरावं लागलं. हे सगळं आपली कृषिव्यवस्था मोडून पडल्याचं धगधगतं द्योतक आहे.'[१२८] दारिद्रयात जन्माला येऊन दारिद्रयातच मृत्यूला सामोरे जाणारा शेतकरी मनाला अस्वस्थ करून जातो.

आयुष्यभर कष्ट करून म्हातारपणी सुखाचे दोन घाससुध्दा या शेतकऱ्यांला खायला मिळत नाहीत. ही वस्तुस्थिती लेखकाने सुभानराव या शेतकऱ्यांच्या रूपाने प्रकाशात आणून दाखवली आहे. दोन्ही मुलांना पदवीपर्यंत शिकविलेले असते दोन मुलांच्या दोन तऱ्हा झालेल्या असतात. मोठया मुलाचा संसार निखळून पडला होता तर धाकटा मुलगा वाममार्गाला लागला होता. धाकटया मुलाला नोकरी लागण्यासाठी दोन लाख रूपये भरावयाचे असतात. हे पैसे भरण्यासाठी मनात नसतानासुध्दा शेत सावकाराकडे गहाण ठेवावे लागते. शेतीसाठी काढलेले कर्ज फेडलेले नसते. मुलाच्या हट्टापायी सावकाराकडे शेत इसारपावती करून गहाण ठेवले जाते. दुर्दैवाने नोकरीसाठी पैसे ज्या व्यक्तीकडे भरले जातात तो साऱ्या तरूणांना गंडा घालून फरारी होतो. येथे पैसेही बुडतात आणि शेतही सावकाराच्या ताब्यात गेलेले असते. शेतीचा करार केवळ अकरा महिन्यांचाच असतो. ही गोष्ट सुभानरावाना कळते तेव्हा त्यांची तगमग होते.

'.... कसायाच्या दावणीला गळा गुतला रे महा .... त्यो कसा सोडवू रे इट्ठला....'[१२९] सुभानरावांची ही तगमग मनाला चटका लावून जाते.

हुशार वाटणारा मधु दलालाकडून फसविला जातो. उरलेले एक लाख रूपये दगडू महाकाळ या सावकाराला देऊन अर्धा मळा सोडविण्याची त्याची ही धडपड केविलवाणीच म्हणावी लागेल. कल्याणीचा मळा म्हणजे सुभानरावांचा जीव होता आणि हाच जीव सावकाराकडे गहाण पडला होता. नाईलाजास्तव स्वत: सुभानराव सावकाराकडे जातात. तेथील सारी परिस्थिती बघून त्यांच्या जीवाची घालमेल होते. या मळयाचा मालक होता असे भुंकणाऱ्या कुत्र्याला तेथील गडी म्हणतो तेव्हा सुभानरावांच्या काळजाला चरकाच बसतो. वडिलांच्या समाधीवर टाकलेली गहाण पाहून त्यांचा जीव गुदमरतो. येथे वडिलांविषयी असणारे प्रेम दिसून येते.

मळयाचे पालटलेले रूप बघून हा मळा त्यांना अनोळखी वाटू लागतो. याविषयीच्या सुभानरावांनी व्यक्त केलेल्या भावना एका सच्च्या शेतकऱ्यांच्या आहेत. 'मळयातली नांगरून वखरून टाकलेली, पुन्हा पुन्हा ट्रॅक्टरच्या पाशीवरून गेलेली माती त्यांना अनोळखी वाटत होती. आपला पुचू पुचू वखर चालायचा त माती‌बी त्याले

काई जुमानायची नाई. खुतून बसायची . आता कशी खरबळून गेली'[३०] ही जखम एका शेतकऱ्यांच्या मनाला झालेली आहे. या जखमाच्या वेदना थोडया म्हणून की काय दगडू महाकाळ त्यावर मीठ चोळतच राहातो. एकामागून एक धक्के देऊन सुभानरावांची अवस्था एका उखडलेल्या झाडासारखी करतो. महाकाळचा एक - एक शब्द ठिणगीसारखा वाटतो. मटण खाण्याचे आमंत्रण देणाऱ्या महाकाळला सुभानराव माळकरी आहेत याचेही भान नसते. ऊसाच्या नावाखाली गांज्या लावून भरघोस पैसा मिळवण्याचा महाकाळचा उद्देश होता. सुभानरावांच्या मनाला लागलेली आग ही दुबळया मनाची होती. दुर्दैवाने या सावकाराविरूध्द काहीच करू शकत नाहीत. आपल्या शेतासाठी आपण केवळ विणवनीच करू शकतो असा सल सुभानरावांना सलत राहतो. त्यांची अवस्था पाण्यावाचून तडफडणाऱ्या एखाद्या माशासारखी होते.

'ह्या मध्यापायी हा सोन्यासारखा मळा कसाबाच्या हाती करारी गेला. अन् त्यो मळयाची मनमानी हेळणा कराय लागला. निराकौरव सभेतली वस्त्रहरणातली धुरपदीच झाली आता आपली कल्याणी.... आपल्याले शाप लागलं ह्या काळया मायचा आपल्या डोळयादेखत हा भाडया आपल्या मायवर अत्येचार करून राह्यला तरी आपन काईच करू शकत नाई ?'[३१] येथे परिस्थितीने दुबळया झालेल्या एका शेतकऱ्याचे दर्शन घडले आहे.

लाचार झालेले सुभानराव पुन्हा पुन्हा महाकाळ सावकाराला विनंती करतात परंतु नावाप्रमाणेच शेतकऱ्यांचा महाकाळ ठरलेल्या सावकाराने मात्र कसलीच दाद दिली नाही. याउलट अपमान करून तेथून हाकलून दिले. या सावकाराकडे सारा लेखी पुरावा असतो. सुभानरावांकडे मात्र काहीच पुरावा नसतो. त्यांच्या अडाणीपणाचा पुरेपूर फायदा त्यांचा मुलगा मधु आणि सावकार यांनी घेतला होता. अकरा महिन्यात दोन लाख रूपये एकरकमी कोणत्याच शेतकऱ्यांला मिळत नाहीत याची खात्री या दगडासारखे काळीज असणाऱ्या दगडू महाकाळला असते म्हणूनच तो सुभानरावांना धमकी वजा सूचना करतो अकरा महिन्यात सर्व पैसे परत दिले तरच शेती माघारी मिळणार असते नाहीतर उरलेले पैसे कोर्टाकडून देऊन सारे शेत त्याच्या मालकीचे होणार असते. यावरून दगडू महाकाळ या सावकाराच्या ताकदीची कल्पना येते. हुशार वाटणारा मधुसुध्दा पूर्णपणे जाळयात सापडलेला दिसून येतो.

एवढे सारे घडूनही सुभानराव सावकारापुढे दयेची भीक मागतात तरीही महाकाळच्या हृदयाला पाझर फुटत नाही. याउलट त्यांच्यावर रागावून त्यांच्या आयुष्याचेच धिंडवडे काढतो. 'दुसरा कोणी आस्ता त थोबाड फोडून सांगतलं

आस्तं'[३२] 'काय म्हन्नार हाये सालं. चिलूट हाये ते. आपून मोठमोठे हात्ती मातीत घातले. आशा चिलटाले कोण जुमानते ?'[३३] या त्याच्या बोलण्यातून हुकूमशाहीवृत्तीचे दर्शन घडले आहे.

अशिक्षित असणारा शेतकरी त्याची झालेली फसवणूक सुभानरावांच्या व्यक्तिरेखेतून लेखकाने मांडली आहे. येथे केवळ आर्थिक शोषण केलेले नसते तर त्या शेतकऱ्यांचे मानसिक शोषणही केलेले असते. सावकाराच्या उन्मत्त बोलण्याने सुभानरावांची मनोवृत्ती पूर्णपणे ढासळून जाते. सावकारी विळख्यात सापडलेल्या सुभानरावांचे कुटुंब उद्ध्वस्त झालेले असते. मुलांच्या शिक्षणासाठी उपासमारीत दिवस काढलेले असतात. पण दोन्हीही मुले बेरोजगारीचे जीवन जगत आहेत. मोठया मुलाच्या संसाराची परवड होते. धाकटा मुलगा मधु वाममार्गाला लागतो. ज्या काळया मातीला आई मानतो तीच काळी आई सावकाराच्या घशात गेली होती. या साऱ्या वावटळीत सापडलेले सुभानराव केवळ शरीरानेच जिवंत असतात. त्यांचा आत्मा कधीच मरून गेलेला असतो.

आर्थिक विवंचनेत तसेच मानसिक विवंचनेत सापडलेल्या शेतकऱ्याला आत्महत्येशिवाय दुसरा मार्ग दिसत नाही. आत्महत्येचा मार्ग तो काही सहजासहजी स्वीकारत नसतो. त्याच्या आयुष्याची झालेली परवड त्याला नकोशी वाटत असते. निसर्गाची अवकृपा, सावकारी पाश, मुलाचा बेजबाबदारपणा, आधुनिकीकरण या विळख्यात सापडलेल्या शेतकऱ्याला स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी आयुष्याचा शेवट करणे हा एकच मार्ग उरतो. या साऱ्या घटनांचे वास्तव चित्रण बारोमासमधून आलेले आहे.

शेतकऱ्यांच्या गळयाभोवती आवळलेला हा सावकारी पाश त्याचा जीव घेतल्याशिवाय सुटत नाही हे कटू सत्य आहे. आज सरकारने सावकारशाही मोडून काढल्याचा दावा केला असला तरी समाजामध्ये अजूनही सावकार शेतकऱ्यांचे आर्थिक तसेच मानसिक शोषण करीत आहेत ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

केवळ सावकारच शेतकऱ्यांचे शोषण करीत नाहीत तर शिक्षणसंस्था, व्यापारी, मजुरसुध्दा अप्रत्यक्षरीत्या शोषण करीत असतात. व्यापारीलोक शेतकऱ्यांच्या मालाची हेळसांड करतात. पडेल भावाने माल खरेदी करून शेतकऱ्यांना लुबाडत असतात तर दुसरीकडे मालाचे वजन करताना दाणोडयाच्या नावाखाली दोन - दोन किलो माल चाळणीत ओतला जातो. हीसुध्दा शेतकऱ्यांची एक प्रकारची केलेली लूटच असते. शेतावर काम करणाऱ्या मजुरांचीही अरेरावी शेतकऱ्यांना सहन करावी लागते. कारण शेतकऱ्यांना वारंवार मजुरांची गरज असते. म्हणूनच हे मजुर मनमानी करताना

दिसतात. तसेच शेतमालकांना धमकीही द्यायला मागेपुढे पहात नाहीत. "ए ऽऽ जातो रे मी काई भिकारी नाई. जास्त भूषाण नको दाखवू त्या डबड्याचं कामाले रोजानं सांगायले येशीलच न माह्या दारात. मंग सांगीन मजा. . . ."[३४] टि. व्ही. बघण्यासाठी आलेला मुगुटराव हा मजुर एकनाथला धमकी देऊन जातो.

ग्रामीण भागात आजही अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. सरकारने काही ग्रामसुधारणा योजना राबविलेल्या असतात पण त्याचा फायदा येथील गरजूंपेक्षा श्रीमंतांनाच अधिक होतो. शौचालयासारखी सरकारी योजना गावागावांमध्ये राबविली जात आहे पण प्रत्यक्षात मात्र ही योजना ग्रामसेवक व सरपंच यांच्यावर अवलंबून असते. या योजनेसाठी मिळणाऱ्या अनुदानापैकी काही रक्कम ग्रामसेवक व सरपंच संगनमत करून लुबाडत असतात. हा राजरोसपणे चाललेला भ्रष्टाचार गरीब जनतेला केवळ डोळयाने पहावाच लागतो. याठिकाणी आपल्या देशातील सत्ताधाऱ्यांची मक्तेदारी गरीब जनतेला आपल्या तालावर नाचवत असते. याला कोणी विरोध दर्शविला तर ही योजना त्याच्या वाटयालासुध्दा येत नाही.

शेतकरी जीवनाला कंटाळून आत्महत्या करतो. पण या त्याच्या आत्महत्येने समस्या संपत नाहीत तर उलट नवीन समस्या उद्‌भवतात. एका शेतकऱ्यांच्या आत्महत्येने सारे कुटुंब उद्‌ध्वस्त होते. याही समस्येचा विचार करण्यास प्रवृत्त व्हायला हवे असा सूचक संदेश लेखकाने दिला आहे. आपल्या दुर्दैवाचा पाढा सतत वाचत बसण्यापेक्षा त्यावर काही उपाय निघतोय का हे पाहणे जास्त गरजेचे आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून ज्या शेतकऱ्यांकडे पाहिले जाते तो शेतकरी नुसता खिळखिळाच झाला नाही तर पूर्णपणे मोडून पडला आहे असेच म्हणावे लागेल.

शेतकरी जीवनाचा तपशील पाहता शेतकऱ्यांची तळमळ वाचकांच्या मनाची पकड घेणारी अशीच आहे. शेतकऱ्यांना लुबाडणारा व्यापारी, सावकार धनवान होतो पण शेतकरी भिकारी होतो. या परिस्थितीला जबाबदार कोण ? या परिस्थितीशी सामना कसा केला पाहिजे याचीही जाणीव बारोमासने करून दिली आहे.

सारांश, लेखकाने शेतकऱ्यांच्या भयावह, दयनीय जीवघेण्या संघर्षाचे चित्रण 'बारोमास' मध्ये मांडले आहे. दारिद्रयामुळे चिरडले गेलेले शेतकऱ्यांचे मन, त्यांचे भावविश्व कर्जबाजारीपणामुळे संपूर्ण घरादाराची झालेली राखरांगोळी, मनातल्या स्वप्नांची झालेली होळी, उद्‌ध्वस्त झालेले ग्रामीण जीवन, मुलांच्या भविष्याची लागलेली चिंता, त्यामुळे अस्वस्थ झालेले मन नैराश्येच्या भोवऱ्यात सापडलेले दिसून येते.

सरकारने शेतकऱ्यांसाठी केलेले प्रयत्न अपुरेच पडतात. ज्या काही उपाययोजना केल्या जातात त्या केवळ कागदोपत्रीच अंमलात आलेल्या असतात वास्तवात मात्र एकही योजना अंमलात आलेली नसते ही बाब दुलर्क्षित करण्याजोगी नव्हे. या बाबींवरही लेखकाने दूरदृष्टिकोनातून विचार मांडला आहे.

❖ **समारोप: -**

उपरोक्त प्रकरणात आपण 'बारोमास' मधील ग्रामीण जीवनचित्रणाचा मागोवा घेतला. शेतकऱ्यांचे जीवन दारिद्रयाच्या दलदलीत खितपत पडलेले आहे. या जीवनाला कारणीभूत असा कोणताही एकच घटक नसतो हे लक्षात घ्यायला हवे. भांडवलशाही, सावकारी पाश, निसर्गाची अवकृपा हे सारे घटक जबाबदार आहेत असे म्हटले तरी वावगे ठरू नये.

शेतकऱ्यांची ही परिस्थिती बदलण्याची आज गरज भासू लागली आहे. रोज अनेक शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत तेव्हा त्यांना कर्जातून मुक्त करून चांगल्या बाजारपेठा निर्माण करून द्यायला पाहिजेत. हा एक प्रकारचा सल्लाच लेखकाने कादंबरीव्दारे दिला आहे.

तसेच जागतिकीकरणाच्या या महालाटेत टिकण्यासाठी शेतकऱ्यांनीही आपली वैचारिकता बदलायला हवी असाही एक विचार एकनाथच्या व्यक्तिरेखेतून लेखक कळत - नकळतपणे व्यक्त करतो. 'बारोमास' ही शेतकऱ्याच्या पराभवाची किंवा दुर्दैवाची कहाणी आहे असे म्हटले तरी त्याची कारणे शोधून त्यावर काही उपाय शोधून समाजाला एक नवीन बोधही देण्याचा प्रयास लेखकाने केला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येविषयीचे सारे चिंतन 'बारोमास' ने केले आहे यात शंका नाही.

बारोमासविषयी अपर्णा पाटील लिहितात, "शेतकऱ्याच्या जीवनात आधुनिकतेमुळे झालेले बदल ग्रामीण साहित्यात आले असले तरी जागतिकीकरणाची चाहूल लागलेल्या शेतकऱ्यांच्या आयुष्याची कथा फारच कमी प्रमाणात लोकांसमोर आली आहे. त्यामुळेच देशमुख यांची कादंबरी महत्त्वाची ठरली. अर्थव्यवस्थेच्या मांडणीत झालेल्या बदलांचे बारोमास कादंबरीत सूक्ष्मपणे चित्रण आले आहे. हा विषय हाताळताना शेतकऱ्यांची कोंडी योग्यप्रकारे मांडण्यात त्यांना यश आले आहे."[३५] असे खात्रीशीरपणे म्हणता येईल.

## संदर्भ

१. देशमुख सदानंद, बारोमास, प्रकाशक - कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे, द्वितीयावृत्ती २००५, पृ. १०.

२. तत्रैव.

३. तत्रैव, पृ. ४४.

४. तत्रैव, पृ. ७०.

५. तत्रैव.

६. तत्रैव, पृ. १४९.

७. तत्रैव, पृ. १८०.

८. तत्रैव, पृ. १८७.

९. तत्रैव, पृ. १८८.

१०. तत्रैव, पृ. १९०.

११. तत्रैव, पृ. १९४.

१२. तत्रैव, पृ. २७०.

१३. तत्रैव, पृ. २६९.

१४. तत्रैव, पृ. २७०.

१५. तत्रैव.

१६. तत्रैव, पृ. ३१८.

१७. तत्रैव, पृ. ३३६.

१८. तत्रैव, पृ. ३२४.

१९. तत्रैव, पृ. २.

२०. तत्रैव.

२१. तत्रैव, पृ. ९१.

२२. तत्रैव, पृ. १४८.

२३. तत्रैव, पृ. १८३.

२४ . तत्रैव, पृ. २६३ .

२५ . तत्रैव, पृ. २९३ .

२६ . तत्रैव, पृ. ७३ .

२७ . तत्रैव, पृ. २१३ .

२८ . तत्रैव, पृ. २१६ .

२९ . तत्रैव, पृ. २९३ .

३० . तत्रैव, पृ. २९९ .

३१ . तत्रैव, पृ. ३०३ .

३२ . तत्रैव, पृ. ३०४ .

३३ . तत्रैव, पृ. ३०५ .

३४ . तत्रैव, पृ. १३१ .

३५ . पाटील अपर्णा, महाराष्ट्र टाईम्स, ६ ऑक्टो . २००२ .

***********